
मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ११ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर-२०२३



दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ११ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर-२०२३

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ

- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- दिव्यवाणी २५
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३६
- वाढदिवसाच्या शुभेच्छा ३७
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०

## चित्रकथा

- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष : मादाम मेरी क्यूरी ०७
- दिनविशेष : जागतिक दूरचित्रवाणी.. १५
- विशेष : गुरुनानक जयंती २०
- कुतुहल : कुत्र्यांना गुन्हेगारांचा... २१
- गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा २६
- भ्रमंती : भामेरचा किल्ला २८
- विशेष : ताजमहाल ३३
- प्रेरक प्रसंग : स्वामीजींचे मित्रप्रेम ३५
- विशेष : वैज्ञानिक पुरस्कार ४२
- विशेष : चला संकल्प करुया... ४३
- विशेष : इस्रोचे अतुलनीय यश ४६
- संतकथा : श्रीखंड्याचा वियोग ४८


## कथा


- बळीराजाची कथा ०५
- मुक्तीचा मार्ग ०८
- खरी पूजा २२
- आनंदाचा राजमार्ग २३
- निंदकाचे घर असावे शेजारी ३२
- महात्मा बुध्दांचा बोध ४४





## कविता


- मी आहे टपाल पेटी ०९
- बालक आम्ही सारे १२
- दिवाळीपर्व ३४
- बालपण आलं परतून ४५




दोन शब्द

# प्रथम क्रमांक कोणाला बरं ?

एकदा शाळेमध्ये निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विषय होता 'माझे आई-बाबा' सर्व मुलांनी अतिशय उत्तम निबंध लिहिले होते. त्यांच्या मधून बंडू, सुशांत आणि मधू या तीन विद्यार्थ्यांचे निबंध प्रथम क्रमांकासाठी निवडण्यात आले. तिन्ही निबंध खूपच सुंदर होते. कोणत्या निबंधाला प्रथम क्रमांक द्यावा असा प्रश्न परीक्षकांपुढे उभा राहिला. सर्वांनीच आपल्या आई-बाबांबद्दल प्रेम व्यक्त केलं होतं. लेखनातही सुभाषितांचा सुंदर वापर केलेला होता.

शेवटी सगळे परीक्षक शाळेच्या हेडमास्तरांकडे गेले. हेडमास्तरांनी लगेच यावर उपाय सुचवत सांगितले, आधी तिन्ही स्पर्धकांच्या आई-बाबांना शाळेत बोलावून घ्या. या स्पर्धेविषयी त्यांना काहीही सांगू नका.

परीक्षकांनी प्रत्येक पालकाशी स्वतंत्रपणे चर्चा करत त्यांच्या मुलांविषयी माहिती काढून घेतली. मुलांचे छंद, त्यांच्या आवडीनिवडी, स्वभाव जाणून घेत असताना बंडूचे बाबा म्हणाले, “आमचा बंडू धाक दाखवल्याशिवाय कोणतंही काम करत नाही. माझ्या धाकामुळे निदान घरात थोडीफार मदत तरी करतो.” सुशांतची आई म्हणाली, “आमचा सुशांत काम सांगितलं, की कधी कधी कंटाळा करतो. मला वेळ नाही असं म्हणतो; पण त्याला जर सांगितलं, की मी तुला खाऊ देईन किंवा तुझ्या आवडीची वस्तू आणून देईन, तर मग तो लगेच काम ऐकतो.”

मधुचे बाबा म्हणाले, “आमचा मधू न सांगता घरात मदत करतो. आईला पाणी भरु लागतो. मला काही वस्तू पाहिजे असेल तर लगेच बाजारातून आणून देतो.” मधुची आई म्हणाली “तो स्वतःची सगळी कामं स्वतःच करतो. कधी कधी त्याच्या बाबांच्या कामातही मदत करतो. ते कामावरुन आल्यावर त्यांचे पाय चेपून देतो. त्याला आम्ही नको म्हटलं, तरी तो म्हणतो, आई-बाबा तुम्ही माझ्यासाठी किती कष्ट घेता! मग मी थोडी मदत केली तर काय बिघडलं ?”

तिन्ही स्पर्धकांच्या बाबतची ही माहिती प्रत्यक्ष त्यांच्या आई-वडिलांकडून ऐकल्यानंतर परीक्षकांना प्रथम क्रमांक कोणाला द्यावा हा निर्णय घेणं सोपं झालं.

मित्रांनो, तुम्हाला काय वाटतं कोणाला प्रथम क्रमांक मिळाला पाहिजे ? ..... हो, अगदी बरोबर ओळखलंत.

मधू आईबाबांना धाकापोटी मदत करत नव्हता किंवा काही मिळेल या लालसेने मदत करत नव्हता, तर त्याला आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव होती. त्यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी तो मदत करत होता. त्याने लिहिलेल्या निबंधातला प्रत्येक शब्द त्याच्या अनुभवातून आलेला होता. म्हणून साहजिकच प्रथम क्रमांकावर त्याचाच हक्क होता, नाही का ?
एक सुंदर सुभाषित देखील आहे -

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले

- राजेंद्र थोरात •••



पौराणिक कथासार

# बळीराजाची कथा

असुरांचा राजा बळी हा भक्त प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा पुत्र होता. राक्षस कुळात जन्म घेऊनही अतिशय चारित्र्यवान, विनयशील आणि प्रजाहितदक्ष राजा होता. त्याने यज्ञयाग करुन खूप पुण्य प्राप्त केलं होतं. आता तो आणखी एक यज्ञ करण्याची तयारी करत होता. त्या यज्ञामुळे त्याला स्वर्ग, धरती आणि पाताळ अशा तिन्ही लोकाचं राज्य प्राप्त होणार होतं. त्रिभुवनावर असुरांचं राज्य स्थापन झालं तर सत्वगुण लोप पावणार म्हणून देव चिंताग्रस्त झाले होते. बळीने आपल्या वाढत्या शक्तीच्या प्रभावाने देवांचाही पराभव केला होता. त्यामुळे सर्व देव भयभीत झाले होते. ते भगवान श्रीविष्णूंकडे गेले. त्यांना आपलं रक्षण करण्याची प्रार्थना केली. हा यज्ञ पूर्ण होण्याआधी उपाय करा अशी विनंती केली. श्रीविष्णूंनी बटू वामन अवतार धारण केला. बटू म्हणजे नुकतीच मुंज झालेला आठ-दहा वर्षाचा मुलगा. यज्ञानंतर ब्राह्मणांना दान दक्षिणा देण्याचा प्रघात असतो. बटू वामन अवतारात श्रीविष्णू बळीराजासमोर जाऊन उभे राहिले. बळीराजाने त्यांना विचारले, “हे ब्राह्मणदेवता! तुम्हाला काय हवंय?” त्यावेळी वामन अवतारातील भगवान विष्णू म्हणाले, “हे राजन! मला फक्त तीन पावलं भूमी पाहिजे.” हे ऐकताच दैत्यगुरु (राक्षसांचे गुरु) शुक्राचार्य सावध झाले. त्यांनी श्री विष्णूंना ओळखलं. त्यांनी राजाला हे दान न देण्याविषयी सुचवलं; परंतु बळीराजाने मात्र वचन दिलं होतं. शिवाय तो दानशूर म्हणूनही प्रसिध्द होता. त्याने कोणालाही रिकाम्या हाताने परत पाठवलं नव्हतं. बटू म्हणाला, “राजा, देतोस ना भूमी? मग सोड संकल्प.” वचन पूर्ण करण्यासाठी झारीने हातावर पाणी सोडलं जातं. आता एकदा का पाणी हातावर पडलं तर ते वचन पूर्ण करावं लागेल म्हणून शुक्राचार्य छोट्याशा किड्याचं रुप घेऊन झारीच्या छिद्रापाशी जाऊन बसले. त्यामुळे पाणी काही पडेना. तेव्हा राजाने एक काडी घेतली आणि

छिद्र मोकळं करण्यासाठी ती आत टाकली. त्याबरोबर झारीतील पाणी पडलं; परंतु त्या काडीच्या टोकामुळे किड्याच्या रुपात असलेल्या शुक्राचार्यांचा एक डोळा फुटला.

वामनाच्या हातावर पाणी सोडल्यानंतर बटू वामनाने विशाल रुप धारण केलं. एका पावलात संपूर्ण धरती व्यापली. दुसऱ्या पावलात स्वर्गलोक. आता तिसरं पाऊल कुठे ठेवू म्हणून त्यांनी बळीराजाला विचारलं. तेव्हा राजा आपलं मस्तक पुढे करत म्हणाला, "आता आपलं तिसरं पाऊल माझ्या मस्तकावर ठेवा." बळीराजाच्या या दानशूरतेवर प्रसन्न होऊन भगवान श्रीविष्णूंनी त्याला सप्तपाताळातील सुतल या पाताळाचे राज्य दिलं आणि विचारलं, "तुझी काय इच्छा आहे?" तेव्हा बळीराजा म्हणाला, "हे भगवान! तुम्ही माझे द्वारपाल होऊन राहावे आणि धरतीवर एक दिवस का होईना माझे राज्य यावे, अशी माझी इच्छा आहे." भगवान विष्णू बळीराजाचे द्वारपाल बनले.

बळीराजा हा शेतकऱ्यांची काळजी घेणारा, शेतीला महत्त्व देणारा असा राजा होता. म्हणून आजही दिवाळीला आश्विन अमावस्येनंतर दुसऱ्या दिवशी येणाऱ्या कार्तिक प्रतिपदेला अंगणामध्ये बळीची प्रतिमा तयार करुन त्यावर दीप तेवत ठेवला जातो आणि मागणं मागितलं जातं, "इडा पीडा टळो बळीचं राज्य येवो." कार्तिक प्रतिपदेलाच बलीप्रतिपदा असं म्हटले जातं.

पुढे याच बळीचा पुत्र बाणासुर याची कन्या उषा हिचा विवाह श्रीकृष्णाचा नातू अनिरुध्द याच्याशी झाला. ❖

# हे ही माहीत आहे का? पहा जरा

# संत- महात्म्यांची संपूर्ण नावे

| | |
|---|---|
| संत तुकाराम | - तुकाराम बोल्होबा अंबिले |
| संत नामदेव | - नामदेव दामाजी रेळेकर |
| संत ज्ञानेश्वर | - ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी |
| संत गाडगे महाराज | - डेबूजी झिंगराजी जानोरकर |
| संत रामदास | - नारायण सूर्याजी ठोसर |
| राजर्षी शाहू महाराज | - यशवंतराव जयसिंगराव घाटगे |
| संत बहिणाबाई | - बहिणाबाई आऊजी कुलकर्णी |
| स्वामी विवेकानंद | - नरेंद्र विश्वनाथ दत्त |
| दादासाहेब फाळके | - धुंडिराज गोविंद फाळके |
| संत सावतामाळी | - सावता पुरसोबा माळी |
| संत मुक्ताबाई | - मुक्ताबाई विठ्ठल कुलकर्णी |
| संत जनाबाई | - जनाबाई दामाजी रेळेकर |
| संत तुलसीदास | - रामबोला आत्माराम दुबे |
| संत सेना महाराज | - सेना देविदास |
| संत निवृत्तीनाथ | - निवृत्ती विठ्ठल कुलकर्णी |
| संत सोपानदेव | - सोपान विठ्ठल कुलकर्णी |
| संत तुकडोजी | - माणिक बंडोजी इंगळे |



दोन नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या महिला शास्त्रज्ञ

# मादाम मेरी क्यूरी

विज्ञानाच्या क्षेत्रात आजपर्यंत अनेक शोध लागलेत. त्यामध्ये स्त्रिया देखील आघाडीवर आहेत. असंच एक स्त्री व्यक्तिमत्त्व म्हणजे मादाम मेरी क्युरी. मेरी क्युरी यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८६७ साली पोलंडची राजधानी वॉर्सा येथे अतिशय गरीब कुटुंबात झाला. त्यांचे आई वडील शिक्षक होते. आई उत्तम पियानो वादकही होत्या. मेरी बारा वर्षांच्या असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. मेरी यांना चार भावंड होती.

आर्थिक स्थिती हालाखीची असल्याने वयाच्या सोळाव्या वर्षीच त्यांनी शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पॅरिस येथे चिकित्सा विज्ञानात शिक्षण घेणाऱ्या बहिणीला शिक्षणासाठी पैसे पाठवावे लागत. बिकट परिस्थितीत त्यांना ब्रेड, बटर, चहा यांच्या आधारे दिवस काढावे लागले.

१८९४ साली त्यांनी प्रयोगशाळेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. २६ जुलै १८९५ साली त्यांचा विवाह पिएर क्युरी या संशोधकाशी झाला.

पहिल्या महायुध्दाच्या काळात मेरी यांनी क्ष-किरण व्हॅन उभारली. क्ष-किरण यंत्रे पुरवली होती. तसेच कॅन्सर या आजारावर काम करण्यासाठी रेडियम संशोधन संस्था उभारली. याच संस्थेत मेरी क्युरी यांची मुलगी आयरिन क्युरी सुध्दा सक्रिय होती. पुढे आयरिन क्युरीलाही नोबेल पारितोषिक मिळाले.

किरणोत्सारिता या शब्दाचे श्रेय मेरी क्युरी यांना जाते. मेरी आणि पियरे या वैज्ञानिक दंपत्याने युरेनियम पेक्षाही जास्त किरणोत्सार करणारे मूलद्रव्य शोधून काढलं. आपल्या पोलंड देशावरुन त्याला 'पोलोनियम' असे नाव दिले. पुढे नियम पेक्षाही जास्त किरणोत्सारी रेडियम नावाचा मूलद्रव्य सापडलं. रेडियम हे युरेनियम पेक्षा सोळाशे पन्नास पट जास्त किरणोत्सारी आहे. हा शोध चिकित्सा विज्ञानासाठी आणि रुग्णांच्या उपचारासाठी खूप महत्त्वाचा ठरला. १९०३ मध्ये मेरी क्युरी यांनी पीएच.डी. केली. रेडिओ ॲक्टिव्हिटीतल्या शोधासाठी या दंपत्यास नोबेल पुरस्कार देण्यात आला. या दरम्यान संशोधन कार्य आणि मुलीची जबाबदारी यामुळे त्यांना परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागले; परंतु दुर्दैवाने याच दरम्यान त्यांचे पती वैज्ञानिक पिएर यांचे अपघातात निधन झाले. पतीच्या सर्व अपूर्ण राहिलेल्या कामांची जबाबदारी त्यांनी स्वत:वर घेतली आणि १९११ साली रसायनशास्त्रातील रेडियम शुध्दीकरणासाठी त्यांना नोबेल पुरस्कार प्राप्त झाला.

सन १९३२ ला पॅरिस येथे क्युरी फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली. तिथलं कार्य त्यांची मुलगी सांभाळू लागली.

मेरी क्युरी यांना रेडिएशनच्या प्रभावामुळे ल्युकेमिया हा आजार झाला आणि ४ जुलै १९३४ मध्ये त्यांचे निधन झाले. ❖



कथा

# मुक्तीचा मार्ग

एका गावात ऋषिकेश नावाचा एक सज्जन गृहस्थ राहत होता. त्याने धर्मग्रंथांचा, शास्त्रांचा खूप अभ्यास केलेला होता. तो अत्यंत धार्मिक वृत्तीचा होता. त्याचे जीवन अतिशय साधे, सरळ आणि परोपकारी होते. तो प्रत्येकाला नि:स्वार्थपणे मदत करत असे. त्यामुळे गावात तो सगळ्यांचा आवडता झाला होता.

एकदा एक संत महात्मा गावात आले. त्यांचे प्रवचन ऐकून ऋषिकेश फार प्रभावित झाला. त्यान्महात्म्यांना आपल्या घरी मुक्काम करण्याची विनंती केली. ऋषिकेशने त्यांची अत्यंत मनोभावे सेवा केली. त्या सेवेने प्रसन्न होत महात्म्यांनी विचारले, "बाळ! तुझी सेवाभावना आणि नम्रपणा यामुळे मी प्रसन्न झालो आहे. बोल, तुझी काय इच्छा आहे? तुझी इच्छा पूर्ण करण्याचं मी तुला वरदान देत आहे."

त्यावर ऋषिकेश म्हणाला, "महाराज! देवाच्या कृपेने मला काहीही कमी नाही. फक्त

एकच इच्छा आहे, आपला अनुग्रह प्राप्त व्हावा. मला मुक्तीचा मार्ग दाखवावा. जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटका व्हावी."

त्याचे हे उत्तर ऐकून महात्मा प्रभावित झाले; परंतु त्यांनी तसे दाखवले नाही. त्यांनी ऋषिकेशची परीक्षा घ्यायचे ठरवले.

अचानक खोटे खोटे रागवत महात्मा म्हणाले, "अरे तुझं काय डोकंबिकं फिरलं आहे का? मुक्ती ही काय एवढी सोपी गोष्ट वाटते का? तुझ्याकडे बघून तुला अनुग्रह द्यावा असं मला तुझ्यामध्ये काहीच जाणवत नाही." हे ऐकून ऋषिकेशला खूप वाईट वाटले. तो महात्म्यांना हात जोडून म्हणाला, "क्षमा असावी महाराज! आपली सेवा करताना माझ्या हातून कळत-नकळत खूप चुका झाल्या असतील, तरी तुम्हीच मला योग्य मार्ग दाखवा. मी त्यानुसार चालण्याचा कसोशीने प्रयत्न करीन." हे ऐकून महात्मा स्मितहास्य करत म्हणाले, "वत्सा! अनुग्रहासाठी अशीच विनम्रता हवी. तुझ्यामध्ये किंचितही अहंकार नाही. तुझी जिज्ञासा, तळमळ पाहून मी तुला अनुग्रह देत आहे. मी केवळ तुझी परीक्षा पाहत होतो. असाच परोपकार करत साधुसंतांची सेवा करत राहा." असे म्हणून त्यांनी ऋषिकेशला ईश्वराचा बोध दिला.

मित्रांनो, ईश्वराचा बोध प्राप्त करण्यासाठी अशीच जिज्ञासा, विनम्रता. तळमळ आणि परोपकाराचा भाव असावा लागतो. ईश्वराची प्राप्ती करणं हाच मनुष्य जन्माचा मुख्य उद्देश आहे. ❖

- संकलन - हसती दुनिया टीम

कविता



# मी आहे टपाल पेटी

आकाराने गोल गोल मी, लाल माझा रंग
चोवीस तास सेवेत तुमच्या, असते सदा दंग

पोस्टकार्ड, अंतर्देशीय, असो काही काम
इंटरनेटच्या दुनियेतही, मी करत नाही आराम

रंग तीन दिले मजला, लाल, निळा, हिरवा
जलद टपाल, स्थानिक पत्र, जिल्हा टपाल सेवा

पूर्वी खूप छान होतं, सुख दु:ख जिव्हाळ्याचा
विषय पत्रात असायचा, प्रेमाने ऊर भरुन यायचा

विसरु नका तुम्ही मला, अधून मधून येत जा
रुसलेले, तुटलेले, संबंध आपले जोडत जा

फोनवरुन सारं आपण, बोलत नाही मनातलं
उचला पेन पत्र लिहा, हृदयात साचून राहिलेलं

मी वाट पाहते आतुरतेने, पुन्हा तुम्ही याल ना?
आपुलकीच्या जिव्हाळ्याच्या, गप्पा गोष्टी कराल ना?

- सौ. वासंती भोसले
(कवठे महांकाळ)

विचारपुष्प

# इच्छा -अपेक्षा मर्यादित ठेवाव्या



भक्त जेव्हा प्रभू परमात्म्याला पाहून त्यावर विश्वास ठेवतो तेव्हाच त्याचं मन शांत होतं आणि जीवन समाधानाने व्यतीत होतं. ज्याच्यामध्ये गुण नाहीत त्याच्यामध्येही तो गुण शोधून काढतो. एखाद्याने कोणाविषयी काही विपरीत जरी सांगितलं तरी त्याचं मन चटकन तशी धारणा बनवत नाही. प्रत्येक गोष्टीतून ते शिकत असतं. कणाकणातून शिकवण घेत असतं आणि ज्याचं असं कर्म असतं, तो एक प्रकारे भक्तीच करत असतो.

आपल्या इच्छा, कामना, विचार, आशा-आकांक्षा कधीच संपत नसतात. इच्छा-अपेक्षा अव्याहतपणे सुरुच असतात. त्या कधीच थांबत

नसतात. आपण मायेमध्ये विचारण करत असल्याने मायावी गोष्टींचे विचार जास्त येत असतात. माया म्हणजे केवळ भौतिक वस्तू किंवा पदार्थ नव्हे, तर भविष्याची चिंता करणे, भूतकाळात रमणे किंवा मागील घटनांविषयी दु:ख करत बसणे ही देखील मायाच आहे. हे आपण थांबवू शकत नसलो तरी त्याला कुठेतरी सीमा घालू शकतो. अन्यथा हे जीवनच व्यर्थ जाईल.

एकदा एक सज्जन वाटेने चालला होता. त्याला वाटेत चार-पाच जण भेटले. सर्वांना एकाच ठिकाणी जायचं होतं. रस्ता थोडा खडतर होता. तेव्हा सर्वांनी विचार केला, की आपण सगळेच एकत्र जाऊ या. पुढे जर काही संकट आलं तर एकत्रितपणे त्याला तोंड देता येईल. चालता चालता ते गप्पागोष्टी करत होते. प्रत्येकजण आपापल्याविषयी बोलत होतं. कोणी आपल्या इच्छा-आकांक्षा बोलून दाखवल्या, तर कोणी आपल्या आयुष्यातील स्वप्नं, महत्त्वाकांक्षा याविषयी सांगितलं. हा विषय काही संपेना. प्रत्येकाला वाटे असं व्हायला पाहिजे, तसं व्हायला पाहिजे.

जाता जाता रस्त्याच्या कडेला एक विहीर लागली. विहिरीच्या काठावर एक बादली आणि दोर होता. सगळ्यांना तहान लागलेली होती; परंतु पाणी काढण्यासाठी जी बादली होती तिचा तळ निघालेला होता. त्या बादलीने पाणी काढणे शक्य नव्हतं. तरीही त्या सज्जनाने ती बादली पाण्यात बुडवली. जोपर्यंत ती पाण्यात होती, तोपर्यंत भरलेली वाटत होती; परंतु बाहेर काढताच सगळं पाणी खाली गळून जात होतं. फक्त रिकामी बादली वर येई. असं त्याने दोन-तीन वेळा केलं. ते पाहून बाकीचे जोडीदार म्हणू लागले, की असं तुम्ही आयुष्यभर करत बसलात तरी बादलीत पाणी काही येणार नाही. ते त्यातून वाहूनच जाणार. मग कशाला प्रयत्न करताय? त्यावर ते सज्जन म्हणाले, "आपण एवढा वेळ आपल्याला काय वाटतं, आपल्या इच्छा-आकांक्षा काय आहेत यावर बोलत आहात, त्या सगळ्याच पूर्ण होतात असंही नाही. जसं, या बादलीला तळ नसल्याने सगळं पाणी खाली निघून जात आहे, तसं आपल्या जीवनामध्ये इच्छा आकांक्षा येतच असतात. त्या कधीच थांबत नसतात. एक गेली की दुसरी, दुसरी गेली, की तिसरी इच्छा मनामध्ये निर्माण होतच राहते. तिची कधीच पूर्तता होत नसते मग कशाला त्याचा विचार करता?"

सांगण्याचा भावार्थ हाच आहे, की अशा प्रकारे जर आपण इच्छा कामनेच्या पूर्तीसाठीच धडपडत राहिलो, तर मनुष्य जन्माचा उद्देशच आपण विसरुन जाऊ. मनुष्य जन्माचं कर्तव्य पूर्ण कसं होणार? म्हणूनच इच्छा कामनांना लगाम घातला पाहिजे. अर्थात इच्छा-अपेक्षा ठेवायच्याच नाही असं नाही. इच्छा-अपेक्षा तर असणारच; परंतु त्याला मर्यादा घालायला हवी. ती मर्यादा येणार कशी?.... तर ती येणार प्रभू परमात्म्याच्या प्राप्तीने! कारण इच्छेचं स्वरुप हे मायावी आहे. माया ही न संपणारी अशी गोष्ट आहे. ती पूर्ण होऊ शकत नाही. कारण माया स्वत:मध्येच अपूर्ण आहे. पूर्ण फक्त परब्रह्म परमात्मा आहे. म्हणून या पूर्ण प्रभू परमात्म्याची प्राप्ती हीच आपल्या जीवनाची सार्थकता आहे. हे सत्य प्राप्त झाल्यानंतर कुठल्याही गोष्टीचं मनाला दु:ख वाटत नसतं. काही गोष्टी प्राप्त झाल्या तरीही धन्यवाद आणि नाही झाल्या तरी धन्यवादाचाच भाव राहतो. जीवनात सुख शांती समाधान येतं. ❖



# बालक आम्ही सारे

बालक आम्ही सारे, जणू आकाशातले तारे
धरतीवर आलो घेऊनि, प्रेम आनंदाचे वारे

किलबिल आमची मस्त, कधी होत नाही सुस्त
नाचून बागडून करतो, आम्ही माकडमेवा फस्त

रात्रंदिन आमची बडबड, खेळताना होते धडपड
बागलबुवाच्या भीतीने, कधी उरात होते धडधड

स्वच्छंदी आमचे जीवन, नसे कोणतीही चण-चण
राग-लोभ नसे कधी आम्हा, देवासम निर्मळ पावन

देवा तुझ्या दरबारी, समान असती सारी
तुझी भक्ती मिळता खरी, संपूनी जाय लाचारी

तुजपाशी मागणे आता, झुकवूनी चरणी माथा
निरागस राहो मन माझे, जरी वय हे वाढत जाता

हे बालपण छान मनोहर, असेच जपू नित्य निरंतर
राहो गुरुचरणी ही मनीषा, व्हावा जीवनप्रवास सुखकर

- मनीषा साळुंखे (मीरा रोड)



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

**प्रश्न : जीवनाचा मूळ उद्देश काय ?**

**उत्तर :** इहलोकीचे जीवन सुखमय करुन परलोकाचा (मुक्तीचा) मार्ग सोपा करुन ठेवावा हा उद्देश आहे. ईश्वराची ओळख करुन घेऊन स्वत:ला ईश्वराशी जोडल्याने दैवी गुण अंगी येतात व इहलोकातील जीवन सुखी होते. तसेच शरीर त्यागल्यानंतर जीवाला भटकंती करावी लागत नाही. ईश्वराशी एकरुप झाल्याने जन्म-मृत्यूचं चक्र समाप्त होतं.

**प्रश्न : ईश्वर सगुण आहे की निर्गुण ?**

**उत्तर :** दोन्ही ईश्वराचीच रुपं आहेत. निर्गुण ईश्वर सगुणरुपात प्रगट आहे. बर्फ आणि पाणी हे भिन्न दिसत असले तरी ते मूलत: एकच आहेत.

**प्रश्न : ईश्वर सर्वव्यापी असूनही लोक फक्त मूर्तीतच देव पाहतात, मग तो दगडात नाही आहे का ?**

**उत्तर :** ईश्वर जर सर्वव्यापी आहे तर तो मूर्तीतही आहे, दगडातही आहे. किंबहुना प्रत्येक वस्तुमध्ये आणि बाहेरही आहे. सारे विश्व ईश्वरापासून बनलेले आहे; परंतु केवळ मूर्ती किंवा दगड म्हणजे देव नव्हे. जसे, शरीराच्या प्रत्येक अवयवात चेतना आहे. तिथे स्पर्श जाणवतो; परंतु केवळ हात किंवा पाय म्हणजे शरीर नाही. तसा ईश्वर एका विशिष्ट जागेत सीमित नाही; तर सर्वव्यापी आहे. खरं तर ईश्वराशिवाय या विश्वात काहीही नाही. ईश्वरच प्रत्येक गोष्टीत आकाराला आलाय.


**प्रश्न : मनुष्यजन्माचं मुख्य ध्येय साध्य कसे करता येईल ?**

**उत्तर :** मनुष्यजन्माचं मुख्य ध्येय आहे, मोक्ष किंवा मुक्ती. आपल्या प्रयत्नाने ही गोष्ट साध्य होणार नाही. त्यासाठी सद्‌गुरुची कृपा आवश्यक आहे. सद्‌गुरुची कृपा प्राप्त होण्यासाठी सद्‌गुरुवर दृढ विश्वास असणे गरजेचे आहे. ज्याचा विश्वास दृढ असतो, त्याच्यावर कृपा होत असते, त्याला ब्रह्मज्ञानाचा बोध होतो. ज्ञानामुळेच मुक्ती संभव होते.

# शब्दकोडे

## २२४

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)




## आडवे शब्द

१. नागालँडची राजधानी
४. नेपाळ देशाची मुख्य भाषा
६. कीबोर्ड व्यतिरिक्त कॉम्प्युटर स्क्रीन वरील ‘करसल’ ला ..... ने नियंत्रित केले जाते.
८. अडीच डझन
१०. छत्रपती शिवरायांचे सुपुत्र राजाराम महाराज यांच्या मातेच नाव (बायजाबाई/ सोयराबाई)
१२. ..... त्याला खवखवे (म्हण)
१३. रामायणातील वालीचा भाऊ
१४. तीन लोक ...... खंड
१६. दरवर्षी..... नोव्हेंबरला बाल दिन साजरा करतात.
१७. या वाक्यात लपलेल्या प्राण्याचे नाव शोधा : मोहनदास सातारा जिल्ह्यात राहतो.
१८. पृथ्वीवरील बुध्दिमान प्राणी, बुध्दिमान योनी, मनुष्य

## उभे शब्द

२. गंगा, ब्रह्मपुत्रा या नद्या या ...... पर्वतावर उगम पावतात.
३. मांजराचे लडिवाळ नाव किंवा शब्द
५. भगवान शिवाची अर्धांगिनी
७. संभाजी राजाची आई
९. पानिपतच्या तिसऱ्या लढाईतील मराठा सैन्याचा सेनापती .... भाऊ होता.
१०. प्रथिने, स्निग्धपदार्थ व पिष्टमय पदार्थ ह्या तिनही घटकांनी समृध्द असलेला पदार्थ कोणता?
११. राखेचा रंग
१३. श्रीकृष्णांचा बालमित्र
१५. साखर कशापासून बनते?

उत्तरे इतरत्र



# जागतिक दूरचित्रवाणी दिन

मित्रांनो, आज जवळ जवळ प्रत्येक घरात टीव्ही पोचलेला आहे. गरीब-श्रीमंत सर्व स्तरातील लोकांचं मनोरंजनाचं अत्यंत जवळचं साधन म्हणजे दूरचित्रवाणी संच. त्यालाच आपण इंग्रजीत टेलिव्हिजन किंवा टीव्ही म्हणतो.

स्कॉटिश अभियंता जॉन लोगी बेयर्ड यांनी १९२४ मध्ये यांत्रिक टेलिव्हिजनचा शोध लावला, तर इलेक्ट्रॉनिक टेलिव्हिजनचा शोध फिलो फर्नस्वर्थ यांनी लावला. त्यातही अनेक संशोधकांनी भर घालून टीव्ही संच विकसित केला. भारतात दूरदर्शनचा पहिला कार्यक्रम १५ सप्टेंबर १९५९ रोजी आकाशवाणी भवन, नवी दिल्ली येथून त्या काळातील राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्रसारित करण्यात आला. शैक्षणिक आणि विकासात्मक विषयांवर आधारित एक तासाचा हा कार्यक्रम होता. त्यावेळी दूरदर्शनचे प्रसारण आठवड्यातून फक्त तीन दिवस अर्धा-अर्धा तास होत असे. त्यावेळी याला टेलिव्हिजन इंडिया असे नाव होते; परंतु १९७५ मध्ये त्याचं नामकरण दूरदर्शन असं करण्यात आलं. त्यानंतर देशात ४९ शहरांमध्ये दूरदर्शन कार्यक्रम निर्मिती केंद्र कार्यरत झाली. ७ जुलै १९८४ रोजी 'हम लोग' ही पहिली हिंदी मालिका दूरदर्शनवरुन प्रसारित करण्यात आली.

मुंबईमध्ये दूरदर्शन केंद्राची स्थापना २ ऑक्टोबर १९७२ रोजी झाली. दूरदर्शन हे एक विलक्षण शैक्षणिक साधन आहे. हे विविध संस्कृतीचं ज्ञान प्रसारित करतं. शेती, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण, पाककला, विविध शोध तसेच लहान मुलांच्या कार्यक्रमाद्वारे वैज्ञानिक आणि सांस्कृतिक कुतूहलाला प्रोत्साहन देते. टेलिव्हिजनची ही उपयुक्तता पाहून संयुक्त राष्ट्रांनी १९९६ मध्ये २१ नोव्हेंबर हा दिवस जागतिक दूरदर्शन दिन म्हणून घोषित केला.

भारतामध्ये २५ एप्रिल १९८२ रोजी रंगीत टेलिव्हिजनच्या प्रसारणाचा प्रारंभ झाला. दूरदर्शन खऱ्या अर्थाने खेडोपाडी पोचले ते १९८२ साली देशात झालेल्या एशियाड क्रीडा स्पर्धेमुळे! आज टीव्ही पाहणाऱ्या कुटुंबांची संख्या १,९० अब्ज एवढी आहे.

आता टीव्ही सिग्नल कसे प्राप्त होतात? तर टीव्ही सिग्नल इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी किंवा रेडिओ लहरी म्हणून प्रसारित केले जातात. टीव्ही ट्रान्समीटर सिग्नल नंतर रिसिव्हर एंटीनाद्वारे प्राप्त होतो. यासाठीच पूर्वी अँटीना उभारले जात. आता मात्र डीटीएच बॉक्समुळे आणि इंटरनेटमुळे विलक्षण प्रगती झालेली आहे. ❖



# चित्रकथा



चित्रांकन व लेखन : अजय कालरा







एकदा रात्री रामदेव आपली गाडी बंद करुन घरी परत येत असताना त्याच्या गाडीला अपघात झाला. त्यात रामदेव आपला एक पाय गमावून बसतो.


रामदेवच्या अपघाताची माहिती मिळताच सीता आणि अभिषेक दवाखान्यात पोचतात.


रामदेवच्या अपघातानंतर सीताला काहीच कळत नाही, की आता घर कसं चालवायचं? ह्याच विचारात ती खास्तावली होती.


आई-बाबा पहा! मी वर्गात प्रथम क्रमांक मिळवला आहे.
शाब्बास! पण अभिषेक, बाळा.. तुझ्या पुढील शिक्षणासाठी आमच्याकडे पैसे नाहायेत.
आई, आपण बाबांची पाव भाजीची गाडी पुन्हा लावली तर? त्यामुळे आपली आर्थिक चणचण देखील कमी होईल.
ठीक आहे बेटा! आपण उद्याच बाजारात जाऊन सर्व सामान खरेदी करु.
दुसऱ्याच दिवशी अभिषेक त्याच्या आईसोबत बाजारात जाऊन सर्व सामान घेऊन येतात. ते घरातच पाव भाजी बनवून गाडीवर घेऊन बाजारात जायला निघतात.


या. या... सर्वांनी गरमा गरम पाव भाजी खा.
अभिषेक आणि त्यांच्या आईची मेहनत फळाला येते आणि त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारु लागते. रामदेव देखील आता काठीच्या सहाय्याने चालू-फिरु लागतो.
काही दिवसानंतर रामदेव आजारातून पूर्णपणे बरा होतो. आता रामदेव आणि सीता दोघे मिळून पावभाजीची गाडी चालवतात. आणि अभिषेक पुन्हा आपले शिक्षण पूर्ण करु लागतो.
तात्पर्य : कठीण प्रसंगी नेहमी हिमतीने काम केले पाहिजे.

# गुरु नानकदेवजी महाराज

गुरु नानक यांची जयंती दर वर्षी कार्तिक पौर्णिमेला गुरु-पर्व नावाने शीख समुदायात साजरी केली जाते. शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरु, गुरु नानकदेवजी महाराजांचा जन्म १४६९ मध्ये लाहोर परिसरातील तलवंडी (सध्या पाकिस्तान) या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कल्याणचंद (मेहता कालू) तर आईचे नाव तृप्ता देवी होते. ते दोघेही धार्मिक स्वभावाचे होते.



नानकजींना लहानपणापासूनच अध्यात्मात रुची होती, बालपणापासूनच ते एकांतप्रिय आणि ईश्वर-प्रेमी होते. साधु-संतांची संगत त्यांना आवडे. त्यांच्या जीवनात अनेक अद्‌भुत आणि असामान्य घटना घडल्या. ते सतत साधू-संतांच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करत. त्यामुळे त्यांचे लक्ष या गोष्टींकडून काढून दुसरीकडे लावायचा त्यांच्या वडिलांचा प्रयत्न असे. एकदा त्यांनी नानकजींना व्यापार करण्यासाठी २० रुपये दिले आणि सांगितले, की या पैशांनी सौदा (व्यापार) करुन ये. नानकजी पैसे घेऊन व्यापार करण्यासाठी निघाले. रस्त्याने जाताना त्यांना काही साधूसंत दिसले. त्यांनी ते २० रुपये खर्चून साधू-संतांना भोजन दिले. थंडीचे दिवस असल्याने त्यांना पांघरायला कांबळ खरेदी करुन दिले. संध्याकाळी ते घरी आल्यावर जेव्हा वडिलांनी त्यांना विचारले, "झाला का सौदा ?"

त्यावर ते म्हणाले, "होय, आज मी सच्चा सौदा केला आहे."

आपल्या मुलाने कामधाम करुन सुखाचा संसार करावा असं त्यांच्या आई वडिलांना नेहमी वाटे. आता त्यांचे लग्न लावून त्यांना वैवाहिक जीवनात बांधून ठेवावे असा निर्णय त्यांनी घेतला, जेणेकरुन ते विरक्ती पासून दूरही राहतील. म्हणून त्यांचा विवाह सुलक्षणी देवीशी लावून दिला. त्यांना दोन मुले झाली. पहिला श्रीचंद आणि दुसरा लक्ष्मीदास.

नानकदेवजी यांची मोठी बहीण बेबे नानकी हिचे पती मुस्लिम सुभेदार दौलतखान लोधी यांच्याकडे कामाला होते. त्यांच्या ओळखीने नानकदेवजींनी काही काळ भांडारगृहात नोकरी केली; परंतु त्यांचा पहिल्यापासूनच अध्यात्माकडे ओढा असल्याने तिथेही धान्य मोजत असताना त्यांची तंद्री लागे. एक, दोन, तीन.... तेरा पर्यंत येताच तेरा-तेरा म्हणत मोजतच राहत. एकदा त्यांनी धान्याचं कोठारच गरिबांसाठी खुलं करुन दिलं. त्यामुळे तिथे जास्त काळ ते टिकले नाहीत.

एकदा ते बेई नदीवर स्नानासाठी गेले असताना अचानक गायब झाले. तीन दिवसांनी त्यांचा देह नदीकिनारी दिसला. या काळातच त्यांना परमात्म्याची भेट झाली, त्याला त्यांनी 'वाहेगुरु' असे

म्हटले, असे सांगितले जाते. त्यानंतर ते 'सतनाम वाहेगुरु' म्हणत राहिले. परमात्मा प्राप्तीनंतर 'देव हिंदूही नाही आणि मुसलमानही नाही. देव एक आहे, देव निराकार आहे,' ही शिकवण त्यांनी दिली. त्यासाठी अनेक ठिकाणी फिरले, मर्दानाजींसोबत ते मक्का मदिना येथेही गेले.

नानकदेवजींना ज्या काही चीजवस्तू मिळते त्या ते गोरगरिबांमध्ये वाटून टाकत. त्याहून जास्त मिळाले तर त्यात गोरगरिबांसाठी लंगरची (जेवण) सोय करत. आजही सर्व गुरुद्वारात लंगरची पध्दत आहे.

ईश्वर आपल्या अंतर्मनात आहे. ज्यांच्या हृदयात दया, क्षमा, शांती, प्रेम ह्या गोष्टी नसून क्रोध, द्वेष, निष्ठुरपणा असतो, तेथे ईश्वर असूच शकत नाही, असे ते सांगत. लोकांनी अंधश्रध्देला बळी पडू नये म्हणून त्यांनी समाजात जागरुकता निर्माण केली.

मानवतेच्या भल्यासाठी त्यांनी आपले शिष्य बाला, मरदाना, रामदास यांच्यासह भारतभर भ्रमण केले. आपल्या सत्तर वर्षांच्या आयुष्यात ते मध्यपूर्व आणि दक्षिण आशिया, श्रीलंका आणि म्यानमार येथेही फिरले. तसेच सियाम, बगदाद, काबूल, कंदहार, श्रीलंका, तुर्की आणि अरब देशांनाही भेट दिली. तिसऱ्या मोहिमेत ते हिमालय, काश्मीर, नेपाळ, सिक्कीम, तिबेट आणि ताश्कंद पर्यंत फिरले.

भाई लेहना नावाच्या त्यांच्या शिष्यास त्यांनी 'गुरु अंगददेव' या नावाने आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले. गुरु नानक देवजींनी 'गुरुग्रंथसाहिब' नावाचा ग्रंथ गुरुमुखी लिपीमध्ये लिहिला. नानकदेवजी वयाच्या ५५ व्या वर्षी करतारपूरला गेले आणि २२ सप्टेंबर १५३९ मध्ये देहत्याग करेपर्यंत तिथेच राहिले. ❖

## कुतुहल

## कुत्र्यांना गुन्हेगारांचा शोध कसा लागतो?

पोलीस अनेकदा कुत्र्यांच्या मदतीने गुन्ह्याचा तपास लावतात. हे आपण चित्रपटांमधून पाहिलेलं आहे. पण ते वास्तव चित्रण असतं. कुत्र्यांची गंधज्ञानाची (वास घेण्याची) शक्ती आपल्या गंधज्ञानाच्या क्षमतेपेक्षा पन्नास पटीने जास्त तीव्र असते. शिवाय निरनिराळे गंध ओळखण्याची शक्तीही त्यांच्याजवळ असते; परंतु त्यासाठी कुत्र्यांच्या या अंगभूत गंधशक्तीचा आपल्याला हवा तसा उपयोग करुन घेण्यासाठी त्याला प्रशिक्षण द्यावं लागतं. आपल्या सगळ्यांच्या शरीराला विशिष्ट गंध असतो. तो ओळखण्याची क्षमता कुत्र्याजवळ असते. ती अधिक धारदार बनेल अशा तऱ्हेने त्याला प्रशिक्षण दिलं जातं. ते देणाऱ्या शिक्षकांच्या हाताला सुटलेल्या घामावरुन किंवा इतर स्त्रावांचा ज्या वस्तूला स्पर्श झाला आहे अशी वस्तू कुठेतरी लपवून ठेवली जाते आणि मग त्या प्रशिक्षकांच्या हाताचा गंध कुत्र्याला हुंगवला जातो. त्याची ओळख पटवून त्यानं आपल्या स्मृतीकोशात साठवली आहे याची खात्री पटली, की मग त्याला त्या मैदानात मोकळं सोडलं जातं. त्या वस्तूला चिकटलेल्या प्रशिक्षकाच्या शरीरगंधाचे रेणू हवेत उडत असतात. त्यांचा वेध घेत मग कुत्रा नेमका त्या वस्तूजवळ पोचतो. याच गंधशक्तीचा उपयोग करुन मादक पदार्थांचा छडा लावण्याचं शिक्षणही कुत्र्यांना दिलं जातं. ते इतकं प्रभावी ठरतं, की असे मादक पदार्थ कपड्यांमध्ये गुंडाळून त्यांचा वास लपवण्याचा प्रयत्न कुणी केला किंवा त्या पदार्थांच्या पार्सलवर सुगंधाचा फवारा मारुन कुत्र्याची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला तरी त्याला यश येत नाही. कुत्रा त्या पदार्थाचा नेमका वेध घेतो. ❖

- संकलन - रुपाली शिंदे (अंबरनाथ)




# खरी पूजा

एक आयुर्वेदाचे प्रसिध्द आचार्य होते. त्यांच्याकडे अनेक शिष्य शिक्षण घेत होते. त्यापैकी दोन शिष्य लव-कुश हे त्यांचे आवडते शिष्य होते. ते दोघेही धार्मिक वृत्तीचे होते. आयुर्वेद आणि भक्ती यांचा समतोल राखण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत; परंतु त्यांचा एक कडक नियम होता. ते दोघेही दररोज पहाटे लवकर उठत. स्नान करुन जवळजवळ चार तास पूजापाठ करीत. मगच ते दोघे आचार्यांकडे जाऊन त्यांच्या आदेशाप्रमाणे रुग्णसेवेचे कार्य करीत.

आयुर्वेदाचार्य स्वत: मानवसेवेच्या व्रताचं तंतोतंत पालन करत होते. पीडित आणि दीनदुबळ्यांची सेवा करत होते. गरीब मुलांना मोफत शिकवत. गरजू कुटुंबांना यथाशक्ती अन्न, वस्त्र, निवारा उपलब्ध करुन देत. असहाय, अनाथ रुग्णांना आश्रय देऊन त्यांच्या मोफत उपचाराची व्यवस्थाही त्यांनी केली होती.

एके दिवशी आश्रमात रुग्णांची संख्या अचानक वाढली. त्यांच्या सेवेसाठी शिष्य कमी पडत होते. त्यांनी लव आणि कुश या दोघांनाही तातडीने बोलावणे पाठवले; पण ते त्यांच्या दीर्घपूजेत व्यग्र असल्याने पूजा अर्धवट सोडून गेले नाहीत. आचार्यांनी थोडा वेळ वाट पाहून पुन्हा निरोप पाठवला. त्यावर दोघेही नाराज मनाने आचार्यांकडे आले.

उर्वरित पान क्र. २४ वर



# आनंदाचा राजमार्ग

एक राजा होता. त्याला कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती; परंतु तो नेहमी दुःखी असे. एकदा तो वेश पालटून आपल्या राज्यात फेरफटका मारण्यासाठी निघाला. फिरता फिरता तो एका छोट्याशा गावात पोचला. तिथे त्याला एका मंदिराबाहेर एक कुंभार मडकी विकत असलेला दिसला. राजा त्याच्या जवळ गेला; पण राजाकडे त्याचं लक्ष गेलं नाही. तो हरिभजनात तल्लीन झाला होता.

राजा त्याला म्हणाला, "भाऊ! मी खूप लांबून आलोय. थोडं पाणी मिळेल का प्यायला ?" कुंभाराने मोठ्या आदराने राजाला बसायला सांगत पाणी दिले. कुंभाराची विनम्रता आणि चेहऱ्यावरील प्रसन्न भाव पाहून राजा काहीसा प्रभावित झाला. राजाने विचार केला, की या छोट्याशा गावात या बिचाऱ्याला मडकी विकून कितीशी कमाई होत असणार ? म्हणून त्याने कुंभाराला विचारले, "भाऊ! माझ्याबरोबर नगरात येशील का ?"

कुंभार म्हणाला, "दादा, नगरात जाऊन मी काय करु ?"

"तिथं तुझी भरपूर मडकी विकली जातील. तुला खूप पैसे मिळतील...."

"...... पण त्या पैशांचं मी काय करु ?"

"अरे बाबा, हल्ली पैशालाच तर खूप महत्त्व आहे. खूप पैसा मिळव आणि भक्ती करत आनंदाने जीवन जग."

"क्षमा करा दादा! पण आता तुम्हीच मला सांगा, सध्या मी काय करतोय?"

राजा क्षणभर विचार करत म्हणाला, "यावेळी तू आरामात बसून देवाचं भजन करत आहेस आणि मी आल्यापासून पाहतोय तू तर अगदी आनंदात आहेस!"

त्यावर कुंभार हसत हसत म्हणाला, "होय दादा, देवाच्या कृपेने मला जेवढं मिळतं, त्यात मी समाधानी आहे. अहो, माणसाच्या गरजा त्या किती? आणि जातानाही यातलं काय सोबत नेणार आहोत? हे नामधनच सोबत येणार आहे. हीच खरी कमाई आहे आणि ही कमाई तर मी इथंही करतोय ना! खरं सांगू, सुख, शांती, आनंद हा पैशानं मिळत नाही! हा मिळतो ते ईश्वरभक्तीनं आणि समाधानी वृत्तीनं!"

हे ऐकून राजा तर खूपच प्रभावित झाला. तो कुंभारापुढे हात जोडत म्हणाला, "हे सद्गृहस्था, कृपया मला हे सांग, की या आनंदाची प्राप्ती मी कशी करावी?"

कुंभार म्हणाला, "दादा! आपले हात उलटे करायला शिका!"

राजाने विचारले, "ते कसे आणि का करायचे?"

कुंभार समजावत म्हणाला, "हे बघा! देवाकडे कधीही काही मागू नका, त्याने आधीच भरपूर दिलेलं आहे. आता थोडंसं दुसऱ्याला द्यायला शिका आणि एकदा का द्यायला शिकलात तर समजून घ्या, की तुम्ही आनंदाच्या मार्गावर पाऊल ठेवलंय म्हणून! स्वार्थ सोडून परोपकार करा. लोकांच्या दुःखाचं सर्वात मोठं कारण म्हणजे स्वतःकडे जे आहे त्यात ते आनंदी नसतात आणि जे मिळालेलं नाही, त्यासाठी दुःखी होतात. जे आहे त्यात आनंदी राहायला शिकलात तर दुःख आपसूकच निघून जाईल. म्हणून जे काही मिळालंय त्यात समाधानी राहावं आणि त्याबद्दल ईश्वराला धन्यवादच द्यावेत."

कुंभाराचे हे शब्द ऐकून राजाला जणू त्याच्या दुःखावरची मात्रा मिळाली. त्याने कुंभाराचे आभार मानत प्रेमाने निरोप घेतला. एका गरीब कुंभाराने आज आपल्याला खऱ्या सुखाचा, आनंदाचा राजमर्ग दाखवला या विचाराने भारावलेला राजा राजवाड्यात कधी परतला हे त्याला कळलंच नाही. त्या क्षणापासून राजाचं जीवनच बदलून गेलं. ❖

– संकलन – हसती दुनिया टीम

## खरी पूजा (पान २२ वरुन)

आचार्यांनी दोघांना प्रेमाने मानवसेवेचे महत्त्व समजावत सांगितले, "वत्सांनो, कर्म हीच पूजा आहे. ज्या कर्मात मानवतेचं हीत आहे, परोपकार आहे, जे कर्म नीतिनियमाला धरुन आहे, तेच खरं कर्म आहे; ज्या ईश्वराची तुम्ही पूजा करत आहात तोच ईश्वर सर्व प्राणिमात्रांमध्ये जीवात्मारुपाने विराजमान आहे. आज या देहात असलेल्या ईश्वराला तुमच्या सेवेची गरज आहे. म्हणूनच तर मानवसेवा हीच ईश्वरपूजा असं म्हटलेलं आहे. ही सेवा टाळून तुम्ही कितीही पूजा पाठ केले, तरी त्याचा काहीही लाभ होणार नाही."

आचार्यांचा बोध ऐकून दोन्ही शिष्यांचे डोळे उघडले.

तात्पर्य : मनुष्य ही ईश्वराची उत्तम कलाकृती आहे. म्हणूनच मिशनची शिकवण आहे, 'नर सेवा नारायण पूजा' या सेवेपेक्षा अन्य कोणतीही पूजा मोठी नाही. ❖

– संकलन – रुचा कुमटेकर (कल्याण)

# केवळ नाव उपयोगाचं नाही



एक व्यक्ती हलवायाच्या दुकानात गेली. दुकानदाराला मिठाईची किंमत विचारली. दुकानदाराने किंमत सांगितली. त्या व्यक्तीने एक किलो बर्फीची रक्कम कागदावर लिहून तो कागद हलवायाला देत सांगितले, एक किलो बर्फी द्या. हलवायाने देखील एक कागद घेतला आणि त्यावर लिहिलं एक किलो बर्फी. त्या व्यक्तीने हलवायाला विचारलं, "अहो हा तर केवळ कागद आहे. बर्फी कुठं आहे?" त्यावर हलवाई म्हणाला, "जसं तू बर्फीची किंमत कागदावर लिहून तो कागद मला दिला, प्रत्यक्ष तेवढी रक्कम तर दिली नाही ना! तसं, मी देखील तुला एक किलो बर्फी कागदावर लिहून दिली."

या उदाहरणातून केवळ हेच स्पष्ट होतं, की पदार्थ, वस्तू किंवा धन यांचं फक्त नाव घेऊन आपलं काम भागत नाही. ज्याप्रमाणे तहानलेल्या व्यक्तीने पाण्याचं नाव कितीही वेळा घेतलं तरी त्याची तहान भागणार नाही. त्याला प्रत्यक्ष पाणी प्यावे लागेल. तेव्हा त्याची तहान भागेल किंवा धनदौलतीचा जप करुन कोणी श्रीमंत होत नाही. सुईपासून ते विमानापर्यंत अनेक वस्तू आहेत. छोटीशी सुई देखील प्रत्यक्ष असल्याशिवाय आपलं काम होत नाही, तर प्रभू परमात्म्याच्या नावाचं केवळ उच्चारण करुन लाभ कसा होईल? जोपर्यंत या प्रभू-परमात्म्याला प्रत्यक्ष जाणत नाही, याच्याशी नातं जुळत नाही, तोपर्यंत लाभ होणार नाही.

परमात्मा सर्वत्र सामावलेला आहे. मनुष्य त्याला जाणत नसल्याने सीमित करत आहे किंवा त्याची जागा एखाद्या विशिष्ट ठिकाणी आहे असे सांगत आहे. काही जण तर म्हणतात, परमात्मा सातव्या आसमानावर बसलेला आहे. तिथून धरतीचं संचलन करत आहे. प्रभूची व्याख्याच ही आहे, की प्रभू परमात्मा सर्वत्र सामावलेला आहे. मग तो एखाद्या विशिष्ट ठिकाणीच कसा असेल?आपणच परमात्म्याची जी व्याख्या केली आहे, स्वत:च खोडून टाकत आहोत. हेच तर अज्ञान आहे. अज्ञानामुळे सर्वत्र सामावलेल्या प्रभूला मनुष्य न जाणो कुठे कुठे जाऊन शोधत आहे. जेवढे संत-महापुरुष या धरतीवर होऊन गेले, त्यांनी प्रभूला अंग संग जाणलेलं आहे, अनुभव घेतलेला आहे.❖

# गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा
## चेंबूर भवन (मुंबई क्षेत्र)

| | |
|---|---|
| १) सोहम जेधे - दादर | - १० वी - ९७.४% |
| २) श्रध्दा चींचकर - मीरा रोड | - १० वी - ९६.२% |
| ३) हर्षिता घाटगे - डीलाईल रोड | - १० वी - ९५.४% |
| ४) वेदांत कडू - कांदिवली | - १० वी - ९५.२% |
| ५) अर्चित शिंदे - खांदा कॉलनी | - १० वी - ९४.६% |
| ६) प्रसाद गोरडे - शिवडी | - १० वी - ९४.६% |
| ७) आकाश दळवी - ठाणे | - १० वी - ९४.०% |
| ८) चंदना चव्हाण - काळा चौकी | - १० वी - ९४.०% |
| ९) समता डांगे - मीरा रोड | - १२ वी - आर्टस् - ९१.५% |
| १०) निखील विश्वकर्मा - सानपाडा | - १२ आर्टस् - ९१.१% |
| ११) प्राची गुप्ता | - बी.ए. (अर्थशास्त्र) १००% |
| १२) वंदना बेंद्रे - दिवा | - बी.ए. (मराठी) - ९२.९% |
| १३) पूनम वागडे - ठाणे | - बी.कॉम - ९२.६% |
| १४) ऋतिका पाटील - अंधेरी | - बी.कॉम - ९२.०% |
| १५) सुश्मिता दास - नवीन पनवेल | - बी.एस्सी (आय टी) - ९८.३% |
| १६) अस्मिता हालेकाना - कळवा | - बी.एस्सी - ९५.१% |
| १७) आकाश विश्वकर्मा - भांडूप | - बी.एस्सी (आय टी) - ९२.५% |
| १८) प्रसाद भोसले - चांदिवली | - बी.एम.एस. - ८६.७% |
| १९) नियती म्हात्रे - उरण | - बी एम एस - ८५.७% |
| २०) आदर्श मोरे - घाटकोपर | - बी एम एस - ८३.१% |
| २१) अमितेश ताम्हाणे - कळवा | - एम ए (समाज शास्त्र) - ७०% |
| २२) हर्षाली खिलारी - कांदिवली | - एम एस्सी - ९५.६% |
| २३) हर्षदा भिलारे - चुनाभट्टी | - एम एस्सी - ९८.३% |
| २४) सचिन विश्वकर्मा - विक्रोळी | - एम एस्सी - ८८.१% |
| २५) आदर्श पाटील - नवीन पनवेल | - एम एस्सी (आय टी) - ८६.३% |
| २६) करण प्रजापती - घाटकोपर | - एम एस्सी (भौतिक शास्त्र) - ८१.७% |
| २७) विवेक पाल - गोरेगाव | - एम एस्सी (सार्वजनिक आरोग्य) -७०% |
| २८) प्रेरणा शर्मा - विक्रोळी | - फार्मसी - ७६.९% |
| २९) जयंत घाडे - कुंभारवाडा | - बी ई (सिविल) - ८८.१% |
| ३०) ऋषीकेश सावंत - बोरीवली | - बी ई (केमिकल) - ८७.१% |
| ३१) अनुजा भोसले - वडाळा | - बी ई (आय टी) - ९२.६% |
| ३२) मनाली गायकवाड - ठाणे | - एम ई (कॉम्प्युटर) - ८७.१% |
| ३३) मेहुल कारकर - साकीनाका | - एम ई (प्लास्टिक इंजि.) - ९६.३% |















भ्रमंती

# किल्ले - भामेर

धुळे जिल्ह्यातील सुंदर किल्ला म्हणजे भामगिरी अथवा भामेर. खान्देशातील अहीर राजांची राजधानी असलेला हा किल्ला, भामेर गावाभोवती नालेच्या आकारात (U) पसरलेला आहे. या किल्ल्याने गावाला तिन्ही बाजूंनी नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. उरलेल्या चौथ्या बाजूला तटबंदी व प्रवेशद्वार बांधून गावाला पूर्ण संरक्षित केले आहे. असा हा सुंदर किल्ला एकदा तरी पाहावा असा आहे.

प्राचीन काळी येथे भद्रवती नगर होते. तेथे युवनाश्व नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची मुलगी भद्रावती हिच्या अपभ्रंश म्हणजे 'भामेर' होय. प्राचीनकाळी सुरत-बुरहाणपूर मार्गावरील वैभवशाली व संपन्न शहर म्हणून 'भामेर' ओळखले जाई. अहीर घराण्याच्या ताब्यात हा किल्ला काही काळ होता. किल्ल्यावरील १८४ लेणी (गुंफा) याच काळात खोदल्या गेल्या असाव्यात. स्थानिक लोक या गुफांना अहीर राजाची घरे म्हणून ओळखतात.

गड पश्चिमाभिमुख असल्याने सकाळी लवकर गड चढण्यास सुरुवात करावी म्हणजे गड चढताना ऊन लागत नाही. धुळे-सुरत रस्त्यावरुन येताना भामेर किल्ल्याच्या तीन डोंगरांपैकी एका डोंगरावर एकाच ठराविक उंचीवर कोरलेली लेणी दिसू लागतात. या डोंगरांना वळसा घालून आपण भामेर गावात प्रवेश करतो.


प्रवेशद्वारातून आत आल्यावर डाव्या हाताला चार फूट उंच दगडी जोत्यावर अखंड दगडात घडवलेले बारा फूटी गोल खांब उभे असलेले दिसतात. पेशव्यांच्या काळात या ठिकाणी त्यांचे कार्यालय होते. गाव पार केल्यावर समोरच्या डोंगरावर कोरीव लेणी दिसतात. डाव्या हाताच्या डोंगरावर भामेर गडाचा बालेकिल्ला आहे. या बालेकिल्ल्याच्या खाली डोंगरात एक मानवनिर्मित मोठी खाच आहे, ती गावातूनही दिसते पण तिचे प्रयोजन त्याजागी गेल्यावरच कळते आणि आपण थक्क होतो.

गावामागून उजव्या हाताच्या पायवाटेने १० मिनिटात आपण भग्न प्रवेशद्वारापाशी येतो. येथे काटकोनात दोन प्रवेशद्वार असून त्या बाजूचा बुरुज कसाबसा तग धरुन उभा आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर समोर गुंफेचा डोंगर व डाव्या हाताला बालेकिल्ल्याचा डोंगर दिसतो. प्रथम उजव्या हाताच्या डोंगरावर चढून गेल्यावर आपल्याला प्रवेशद्वाराच्या स्थानाचे महत्त्व कळते. या किल्ल्यात प्रवेशद्वार अशा ठिकाणी बांधले आहे, की प्रवेशद्वाराकडे येणारा शत्रू बालेकिल्ल्यातून व उजव्या बाजूच्या डोंगरावरुन सहज टप्प्यात येईल. त्याला कुठलाही आडोसा मिळणार नाही. उजव्या हाताच्या डोंगरावर छोटासा दगडांचा टप्पा आहे. तो चढून गेल्यावर आपण मशिदीपाशी पोचतो. तिथून खाली उतरुन परत प्रवेशद्वारापाशी येऊन मग छोटेसे मैदान पार करुन आपण लेण्यांच्या डोंगरापाशी येतो. या डोंगराला सर्व बाजूंनी एकाला एक लागून लेणी खोदलेली आहेत. एकूण १८४ लेण्यांपैकी १० लेणीच आपल्याला पाहता येतात. लेण्या पाहून झाल्यावर आपण खडकात खोदलेल्या पायऱ्यांनी डाव्या हाताच्या डोंगरावर चढाई सुरु करायची. या चढाई दरम्यान किल्ल्याचे प्रवेशद्वार खाली दिसते. पायऱ्या संपल्यावर पहिल्या टप्प्यावर परत काही गुंफा आहेत. तिथून थोडे वर चढून गेल्यावर तीन कोरीव गुंफा लागतात. या गुंफांच्या दाराच्या पट्टीवर गणपतीची मूर्ती कोरलेली आहे. गुफांच्या दारावर नक्षी काढलेली आहे. गुंफांपासून वर चढत गेल्यावर आपल्याला समोर बुरुज व त्यामागे किल्ल्याचे सर्वोच्च टोक दिसते, तर उजव्या हाताला दगडात खोदलेली प्रचंड खाच दिसते. शत्रूला फसविण्यासाठी ही मानव निर्मित खाच दगडात कोरण्यात आली आहे. १५ फूट X ३० फूट खाचेच्या दोन्हीं बाजूंना उंचावर बुरुज आहेत. तर समोरच्या बाजूला खोल दरी. ही खाच किल्ल्याच्या पायथ्यापासून दिसत असल्यामुळे तिथेच बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार आहे असा शत्रूचा गैरसमज होत असे, अरुंद पायऱ्यांवरुन शत्रू ह्या खाचेत आल्यावर दोन्ही बुरुजांवरुन त्यांच्यावर मारा करणे सहज शक्य होत असे. समोरच्या बाजूला खोल दरी व मागील बाजूस असलेल्या अरुंद पायऱ्यांमुळे शत्रुची कोंडी होत असे. तसेच शत्रुने बालेकिल्ल्यात प्रवेश केल्यास बुरुजावरुन दोर टाकून या खाचेत उतरुन निसटून जाणे सहज शक्य असे.

दगडाचा थोडासा टप्पा चढून गेल्यावर आपण खाचेच्या बाजूवरील डोंगरात पोचतो. इथून आजूबाजूच्या प्रदेशाचे विहंगम दृश्य दिसते. खाचेतून उतरुन बालेकिल्ल्याकडे चढत गेल्यावर आपल्याला बुरुज व तटबंदीचे अवशेष दिसतात. तिथून पुढे गेल्यावर पिण्याच्या पाण्याचे टाके लागते. भामेर किल्ल्याच्या सर्वोच्च टोकावर जाण्यासाठी पुन्हा एक दगडी टप्पा चढावा लागतो. वर लांबवर पसरलेले पठार आहे. या पठारावर एक छोटे मंदिर व त्याच्या बाजूला २० X २० फूटी पिण्याच्या पाण्याचे टाके आहे. या ठिकाणी आल्यावर आपला संपूर्ण किल्ला पाहून होतो. भामेर किल्ल्यावरुन पूर्वेकडे दोन जोड शिखरे दिसतात. ती राव्या-जाव्या या नावाने प्रसिध्द आहेत.

भामेर किल्ला, धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात येतो. साक्रीच्या अलीकडे ३ किमी अंतरावर नंदूरबार फाटा लागतो. तिथून ७ किमी अंतरावर भामेर गाव आहे. ❖

# हसा मुलांनो हसा



बंड्याचे बाबा : (शिक्षकांना) मी बंड्याचा बाबा आहे. काय उत्तम चाललाय ना त्याचा अभ्यास!

शिक्षक : बिच्चारा बंड्या.... त्याचा अभ्यास कसा उत्तम असणार! बरं ते जाऊ द्या, तुम्ही जेलमधून कधी सुटलात ?

बंड्याचे बाबा : अहो, हे काय बोलताय तुम्ही ? मी कधी जेलमध्ये होतो ?

शिक्षक : पण जेव्हा जेव्हा पालकांना शाळेत घेऊन या म्हणून सांगितलं तर बंड्या रडक्या तोंडाने म्हणायचा, आई हॉस्पिटलमध्ये आहे आणि बाबा जेलमध्ये आहेत.

बंड्याचे बाबा : मी जेलमध्ये जेलर आहे आणि त्याची आई नर्स आहे.

---

आयोजक : ज्याच्या आडनावाची अक्षरं कमी असतील त्याला बक्षीस देण्यात येईल.

काळे आणि नेने : (एकदमच) मग तर बक्षीस मलाच मिळणार.

एक गृहस्थ : बक्षीस मलाच मिळणार!.... कारण माझं आडनाव पै आहे.

पांडूतात्या : अरे देवा! ही पोरगी रस्त्यात बेशुध्द पडलीय वाटतं! अरे जा कोणी तरी पटकन लिंबू सोडा घेऊन या.

एक तरुण: (धावत जाऊन लिंबू सोडा घेऊन येतो) हे घ्या काका!

पांडूतात्या (लिंबू सोडा घटाघटा पिऊन ढेकर देत) असले प्रसंग पाहिले, की मलाही चक्कर येते. म्हणून लिंबू सोडा घेतला, बरं वाटलं, येतो हं मी....

---

चिंटू : बाळूकाका! सकाळी उठल्याबरोबर जर तुम्हाला देव भेटला तर तुम्ही काय कराल ?

बाळूकाका : मी आधी बघेन, की देव माझ्या घरी आलाय, की मी देवाच्या घरी आलोय ते!

---

न्यायाधीश : तू चोरी करत होतास तेव्हा त्या घराचा मालक तुझ्यापासून किती अंतरावर होता ?

चोर : साहेब, मी चोरी करायला गेलो होतो, जमीन मोजायला नाही.



बाळूकाका : डॉक्टर, माझ्या पोरानं चावी गिळलीय.
डॉक्टर : बरं, किती वेळ झालाय ?
बाळूकाका : आठ दिवस झाले.
डॉक्टर : काय ? आठ दिवस झाले आणि आज तुम्ही माझ्याकडे आणता ? एवढे दिवस काय केलं ?
बाळूकाका : एवढे दिवस डुप्लिकेट चावी होती; पण ती आजच हरवली.

---

पम्या : डॉक्टरसाहेब, माझ्या अंगाला लई खाज सुटते.
डॉक्टर : बरं, या गोळ्या रोज तीन टाईम घ्या.
पम्या : पण खाज नक्की जाईल ना ?
डॉक्टर : मग काय या गोळ्या नखं वाढवायला दिल्या ?



---

अकबर : बिरबल ! एके जागी अक्कल आहे आणि दुसऱ्या जागी पैसे आहेत. यापैकी तू कोणती गोष्ट घेशील ?
बिरबल : मी पैसे घेईन.
अकबर : चूक मी तर अक्कल घेईन.
बिरबल : बरोबर आहे तुमचं महाराज ! ज्याच्याकडे जी गोष्ट नाही, तीच तो घेणार !

---

पत्नी : अहो, तुमची काळी पँट इस्त्री करताना माझ्याकडून जळाली, सॉरी हं !
पती : जाऊ दे गं ! काळ्या रंगाची दुसरी पँट आहे माझ्याकडे !
पत्नी : मला ठाऊक आहे म्हणूनच मी त्या पँटीचा तुकडा कापून जळलेल्या पँटीच्या भागावर ठिगळ लावून टाकलं.



जगू: दामू अण्णा ! अहो, रोज योगा-प्राणायाम करत जा.
दामू अण्णा : नको रे बाबा; मरायचं नाहीये मला.
जगू : अहो, प्राणायामानं कोण मरतो थोडंच ? उलट आयुष्य वाढतं.
दामू अण्णा : आमच्या शेजारचे गणोबा टी.व्ही. वर रामदेव बाबांचा योगा करत असताना वारले.
जगू : ते कसे काय ?
दामू अण्णा : बाबांनी सांगितलं श्वास आत घ्या, मी सांगेन तेव्हा बाहेर सोडा.
जगू : मग ?
दामू अण्णा : मग काय ? गणोबांनी श्वास घेतला, तेवढ्यात लाईट गेली. ती दोन तासांनी आली. गणोबा वाट पाहतच राहिले श्वास केव्हा सोडायला सांगतात त्याची !

---

शाळा तपासणीस : काय हो गुरुजी, तुम्ही वर्गात चक्क घोरत होतात ?
गुरुजी : नाही हो साहेब, मुलांना रामायणाची कथा सांगत असताना कुंभकर्ण कसा झोपायचा ते शिकवत होतो.

---

मालक : या नोकरीसाठी आम्हाला एका जबाबदार माणसाची गरज आहे.
नोकर : मी तसाच आहे. यापूर्वी मी जिथे होतो तिथे काही झालं तरी प्रत्येक गोष्टीत मलाच जबाबदार मानले जायचे.



कथा

# निंदकाचे घर असावे शेजारी

फार फार वर्षांपूर्वीची ही घटना आहे. रशियामध्ये झार वंशीय राजा राज्य करीत होता. त्याचा एक महामंत्री होता. त्यांचे नाव होतं काऊंट बिटी. एके दिवशी महामंत्री बिटीने आपल्या सचिवाला बोलावून आदेश दिला की, अशा लोकांची यादी बनवून आण, ज्यांनी विविध वर्तमानपत्रातून, मासिकातून माझ्या विरोधात लेखन केले आहे. महामंत्रीच्या आदेशानुसार सचिवांनी आपल्या कर्मचाऱ्यांना तसा आदेश दिला आणि अशा लेखकांची यादी बनवून महामंत्री बिटीला दिली. ती यादी पाहून बिटी यांना मोठे आश्चर्य वाटले. कारण त्या यादीमध्ये त्यांच्या विरुध्द लिखाण करणाऱ्या शेकडो लेखकांची नावे होती. त्यानंतर महामंत्री बिटी यांनी आपल्या सचिवांना पुन्हा आदेश दिला, की या यादीतील अशा लेखकांची नावे निवडा, ज्यांनी सगळ्यात जास्त कठोरपणे माझी निंदा केली आहे.

पुन्हा नवीन यादी बिटींसमोर सादर करत सचिवाने विचारले, "महोदय, आता या लेखकांना काय शिक्षा दिली जाणार ?" ते म्हणाले, "शिक्षा ? कशासाठी शिक्षा ? आता मी या यादीतून माझी कठोर निंदा करणाऱ्या निंदकाला निवडणार आहे

आणि त्याला माझा सल्लागार आणि वर्तमानपत्राचा मुख्य संपादक बनवणार आहे. माझ्या अनुभवाने मला शिकवलंय, की आपला सगळ्यात कठोर निंदक हाच आपला खरा हितचिंतक असतो. यादीतील इतर सर्व लेखकांना समाजोपयोगी कार्यासाठी नेमले जाणार आहे."

महामंत्री काउंट बिटी यांनी केलेले विधान अगदी योग्य आहे. व्यक्तीचा निंदक हाच त्याचा सगळ्यात मोठा हितचिंतक असतो. कारण तो खरं बोलण्याचा धाडस करतो. म्हणूनच तर संत म्हणतात, निंदकाचे घर असावे शेजारी. गोड गोड बोलणारे, तोंडापुरती स्तुती करणारे लोक हे व्यक्तीच्या आणि संस्थेच्या प्रगतीच्या मार्गामध्ये अडथळे ठरतात. ज्यांना समाजाला काहीतरी द्यायचं आहे, त्यांनी अशा प्रामाणिक निंदक व्यक्तींचं सहकार्य घ्यायला हरकत नाही. कारण अशा व्यक्ती प्रगतीचा योग्य रस्ता दाखवू शकतात. ❖

– संकलन – रुपाली शिंदे (अंबरनाथ)

## अनमोल वचन

कोणत्याही देशाचा भूतकाळ हा एखाद्या रोपट्याच्या मुळासारखा असतो. त्याला जर पाणी दिले नाही तर ते रोपटे कोमेजून जाईल. पण रोपट्याच्या वाढीसाठी सूर्यप्रकाशाची व मोकळ्या हवेची गरज असते. हा प्रकाश व ही हवा म्हणजे वर्तमानकाळातील गरजांचे भान या दोन्ही गोष्टींचे जेव्हा आपण भान ठेवतो तेव्हा राष्ट्राच्या रोपट्याचे महावृक्षात रुपांतर होते.

-पंडित जवाहरलाल नेहरु



# ताजमहालाविषयी विशेष

- ताजमहाल बांधण्यासाठी एकूण २२ वर्षे लागली. त्यासाठी जवळजवळ २२ हजार मजूर काम करीत होते. ताजमहाल बांधायला सन १९३२ मध्ये सुरुवात केली. सन १९५४ मध्ये बांधकाम पूर्ण झाले.
- आश्चर्याची बाब म्हणजे ताजमहाल हा लाकडांच्या आधारावर उभा आहे. ही लाकडे टिकण्यासाठी ओलाव्याची गरज भासते. तो ओलावा यमुना नदीच्या पाण्यातून मिळतो.
- ताजमहाल हे जगातील सर्वाधिक जास्त भेटी दिले जाणारे स्थळ आहे. ताजमहाल बघण्यासाठी जगभरातून दररोज जवळजवळ १२ हजार तर वर्षाला सुमारे ४० लाख पर्यटक येत असतात.
- ताजमहालाच्या शेजारी ४१.६ मीटर उंचीचे एकूण ४ मिनार आहेत. ते बाहेरच्या बाजूस थोडेसे झुकलेले आहेत. कारण भूकंपासारखी परिस्थिती जर निर्माण झाली तर ते मिनार मकबऱ्यावर न पडता बाहेरच्या बाजूस पडतील आणि मुख्य मकबऱ्याचे रक्षण होईल.
- ताजमहाल बांधण्यासाठी त्यावेळी एकूण ३ कोटी २ लाख रुपये खर्च आला होता. ताजमहाल आताच्या काळात बांधला असता तर त्यासाठी जवळपास ७००० कोटी रुपये खर्च आला असता.
- ताजमहालाचा रंग वेगवेगळ्या वेळी बदलत असतो. सकाळी पाहिल्यावर तो गुलाबी रंगाचा दिसतो. रात्री पाहिल्यावर तो पांढऱ्या रंगाचा दिसतो तर चांदण्या रात्री तो सोन्यासारखा दिसतो.
- ताजमहालाला २८ प्रकारची मौल्यवान हिरे माणके लावून सजवण्यात आले होते. पुढे इंग्रजांनी ते काढून घेतले होते. ❖

कविता

# दिवाळीपर्व

चला करु या साजरे दिवाळी पर्व
शिकू या त्यातूनच मानवतेचा धर्म

धनत्रयोदशी देते शिकवण महान
नरसेवा आहे खऱ्या धनाची खाण

लक्ष्मीपूजनाचे जाणू या खरे मर्म
नारायण पूजेविना व्यर्थ सारे कर्म

बलीप्रतिपदेला येतो दिवाळी पाडवा
वाटू या सर्वांना फराळाचा गोडवा

भाऊबीज देते बंधुत्वाची शिकवण
बंधु-भगिनीचे नाते आहे अति पावन

पणतीकडून मात्र इतकंच शिकायचं
इतरांसाठी जळून स्वत:ला मिटवायचं

नको फटाके आणि नको प्रदूषण
निरोगी अन् सुदृढ राहू सारे आपण

दीपावलीची रीत, मिळून सारे बदलू या
मानवतेचा दीप होऊन, सदा तेवत राहू या



- सुकदेव पाटील (कल्याण)



# स्वामीजींचे मित्रप्रेम



स्वामीजींना देश-विदेशात खूप चाहते मिळाले होते, त्यापैकी हजारो त्यांचे अनुयायी झाले. अपार प्रसिध्दी लाभलेली असूनही मित्रांशी वागताना स्वामीजींच्या वर्तनात तसूभरही फरक पडला नव्हता. मित्रांसाठी ते सदासर्वदा नरेंद्रच होते.

असाच एक प्रसंग लाहोर येथे घडला. स्वामीजी लाहोरला गेले असताना, तेथे त्यांना त्यांचे बालमित्र मोतीलाल बोस भेटले. मोतीलाल हे इंडियन ग्रेट सर्कसचे मालक होते. त्यावेळी ते लाहोरला सर्कस घेऊन आले होते. अनेक वर्षांनी बालपणीचा सवंगडी भेटल्याने स्वामीजी गप्पात रमून गेले. वेगवेगळ्या विषयांवर गप्पा रंगल्या होत्या. स्वामीजी इतर मित्रांविषयी देखील चौकशी करत होते; परंतु मोतीलाल जरासे अवघडल्यासारखे दिसत होते. संकोच करतच ते म्हणाले, "खरं तर तुला काय हाक मारावी तेच कळत नाही, नरेंद्र म्हणावे की स्वामीजी?" हे ऐकून स्वामीजी खळखळून हसले आणि मोतीलालजींना म्हणाले, "अरे तू वेडा आहेस का? माझ्यामध्ये काहीही बदल झाला नाही. जसा तू माझ्यासाठी बालपणी मोती होतास आणि आजही मोतीच आहेस, तसा मी देखील तुझ्यासाठी त्यावेळी नरेंद्र होतो आणि आजही नरेंद्रच आहे!" स्वामीजींनी हे वाक्य इतकं प्रेमाने आणि आपुलकीने उच्चारलं, की मोतीलालजींना गहिवरुन आलं. त्यांच्यात तसे अंतर उरलेच नाही. त्यांनी स्वामीजींना घट्ट मिठी मारली आणि तितक्याच मायेनं, आपुलकीनं स्वामीजी देखील आपल्या मित्राला आलिंगन देत पाठ थोपटत राहिले.

असे होते स्वामीजी! आणि असं होतं त्यांचं मित्रप्रेम! एवढे मोठे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तत्त्ववेत्ते, धर्मोपदेशक असूनही ती उच्च अवस्था त्यांनी मैत्रीच्या आड येऊ दिली नाही. ❖

– संकलन – हसती दुनिया टीम

# बहुगुणकारी बीटरूट



बीटरुट हे हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात विक्रीस येणारे कंदमुळ असून हे आपल्याला अनेक प्रकारच्या गंभीर आजारांपासून वाचवते. हे कंदमुळ अत्यंत पौष्टिक आहे. अनेक जण त्याची चव आवडत नाही म्हणून बीट खाणे टाळतात; पण ही एक मोठी चूक ठरु शकते. विविध फळे खाऊनही जे घटक मिळत नाहीत ते घटक केवळ एक बीट खाल्ल्याने मिळतात. आता हिवाळा सुरु झाला आहे. अशा वेळी बीट हे घरातील सर्वांसाठी अत्यंत फायद्याचे ठरु शकते.

**बीट खाल्ल्याने होणारे फायदे :-**

☞ शरीरात हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढते. बालवयात हिमोग्लोबीन टिकून राहणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी बीट हे अतिशय फायदेशीर ठरते.

☞ बीटमध्ये असलेले नायट्रिक ऑक्साईड व्हॅसोडिलेटर म्हणून कार्य करते, त्यामुळे ऊतींमध्ये रक्ताचे परफ्यूजन वाढते. तसेच नायट्रिक ऑक्साईडमध्ये वाढ होऊन रक्तदाब कमी होण्यास मदत होते. बीटमधील नायट्रेट्समुळे रक्तवाहिन्यांना आराम मिळून उच्च रक्तदाब कमी होतो.

☞ बीट हे ॲथलेटिक कामगिरी वाढवते. त्यामुळे धावपटू कमी श्रमात जलद गतीने अधिक वेळ धावू शकतो. बीटमधील शर्करा अतिरिक्त नायट्रेट्स आणि लोह पुरवून ऊर्जा वाढवते.

☞ अन्नामधील ॲंटिऑक्सिडंट गुणधर्म पेशींचे संरक्षण करतात आणि रक्तातील ॲंटिऑक्सिडंट्सची पातळी वाढवतात. ते शरीराला हानिकारक असलेल्या मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करतात. बीट हे निरोगी मेंदूच्या कार्यास प्रोत्साहन देते. बीटमध्ये लक्षणीय प्रमाणात बोरॉन देखील असते, ते मानवी मेंदूचे कार्य आणि एकाग्रता वाढवतात. खरंतर, मेंदूचं कार्य निरोगी राखण्यासाठी आणि स्मृतिभ्रंश (स्मरणशक्ती, संवाद आणि विचारशक्ती कमी होणे) टाळण्यासाठी बीट हे अत्यंत प्रभावी आहे.

☞ बीट नैसर्गिकरित्या बीटलेन्स नावाच्या फायटोन्यूट्रिएंट्सच्या गटाच्या साहाय्याने हानिकारक विषारी पदार्थांपासून आपले शरीर डिटॉक्सिफाय (निर्विषिकरण) करते. बीट रक्त, त्वचा आणि यकृत शुध्द करते आणि शरीराची कार्यक्षमता अधिक चांगल्या प्रकारे वाढवते. ❖

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



श्रीनिधी काळोखे


आराध्या गोळे


ओमकार महाडिक


प्रेम पारकर


अनिष पवार


आशना नारायणकर


वेद कडूकर


श्रीशा वारडे


रेहा वर्तक


रश्मिता गव्हाणे


प्रिशा भुईटे


निशांत भागडे


श्रवण पेरवी


वीरा सुळे


दैविक माने


- - -


त्रिशा गुरव


विराट पाटील


ध्रुव पाटील

**वाढदिवसाचे फोटो किमान दीड महिना आधी पाठवावेत.**

# किट्टी



चित्रांकन व लेखन : अजय कालरा




मुलांनो! पॅराशूट एक वैज्ञानिक उपकरण आहे. त्याचा शोध ए.जे. गार्नेरिन यानं लावला.कळलं
हो! टीचर
टीचर! पॅराशूटचा आपल्याला काय उपयोग होतो? ते पुग्याप्रमाणे कोणाला गिफ्ट म्हणून सुध्दा देता येत नाही. त्याला उघडलं तर ते आपल्याबरोबर उडवून घेऊन जातं.
विमानातून प्रवास करणाऱ्यांसाठी उपयोगी येतं. संकटकाळी पॅराशूटच्या साहाय्याने प्रवासी सुखरुप जमिनीवर उतरु शकतो.
युध्दाच्यावेळी याच्या सहाय्याने सैनिक आपल्या छावणीवर उतरु शकतो.
टीचर पॅराशूटची छत्री कसली बनलेली असते.
पॅराशूटची छत्री रेशम किंवा नायलॉनची असते कारण रेशम व नायलॉन मजबूत आणि हलकं असल्यामुळे पॅराशूटला उडण्यास मदत होते.


टीचर, पॅराशूट गोलाकारच असते का ?
नाही किट्टी ! ते आयताकार तसेच अंडाकृतीही असते. तसेच ते रंगीबेरंगीसुध्दा असते.
मुलांनो, पॅराशूटच्या आधारे उडणाऱ्या व्यक्तीला काय म्हणतात ?
माहित नाही टीचर, कृपया तुम्हीच सांगा.
पॅराशूटने उडणाऱ्या व्यक्तीला स्कायड्रायव्हर म्हणतात.
हो, टीचर


मुलांनो, आज पॅराशूटींग एक असा खेळ बनला आहे, की ज्यामध्ये स्कायडायव्हर आकाशात खूप उंचावर जाऊन जमिनीवर झेप घेतात.
त्यांना भीती वाटत नाही का टीचर ?
भीती कशाची ? त्यांनी त्याचे पूर्ण प्रशिक्षण घेतलेले असते.
टीचर, आज तुम्ही पॅराशूटबद्दलची पूर्ण माहिती दिलीत त्याबद्दल धन्यवाद !




### शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार

या पुरस्काराचा शुभारंभ सुप्रसिध्द वैज्ञानिक डॉ. शांतीस्वरुप भटनागर यांच्या स्मृतिनिमित्त सन १९५७ रोजी करण्यात आला. हा पुरस्कार भारतीय औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन परिषदे द्वारा उल्लेखनीय आणि असाधारण संशोधनासाठी जीवशास्त्र, रासायनिक, पर्यावरणीय, सागरी आणि खगोल शास्त्र, अभियांत्रिकी, गणित, चिकित्सा आणि भौतिक शास्त्र इ. क्षेत्रांमध्ये दिला जातो.

या पुरस्काराचा मूळ उद्देश विज्ञान आणि इतर औद्योगिक क्षेत्रांमधील अनन्यसाधारण प्रतिभावंतांचा परिचय करुन देणे हा आहे. आतापर्यंत एकूण ४५० पेक्षा अधिक व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कारांमध्ये एक प्रशस्तिपत्र, रोख रक्कम ५ लाख, एक मेडल आणि सेवानिवृत्तीपर्यंत मानधन दिले जाते. या पुरस्काराचे प्रथम विजेते टोप्पुर सितापती सदाशिवन हे होते (जीव विज्ञान १९६०)

### भारत सायन्स पुरस्कार

भारत सायन्स पुरस्कार हा भारतात विज्ञानासाठी देण्यात येणारा सर्वोच्च आणि प्रतिष्टीत पुरस्कार आहे. विज्ञानातील उत्कृष्टता आणि उपयोग जनमाणसाच्या जीवन विकासाकरता व्हावा हाच या पुरस्काराचा उद्देश आहे. इंजिनिअरिंग वैद्यकीय आणि शेतीविषयक संशोधनाला या पुरस्काराच्या माध्यमातून प्रेरणा दिली जाते. भारतीय विज्ञान कॉन्ग्रेस द्वारा दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो.

या पुरस्काराची घोषणा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी २००३ मध्ये केली आणि २००४ करीता प्रथम पुरस्कार रसायन शास्त्रज्ञ प्रो CNR राव यांना २००६ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या द्वारे दिला गेला.

पुरस्काराचे स्वरुप : पुरस्काराची सनद, सुवर्ण पदक आणि २५ लाख रुपये इतकी रक्कम पुरस्कार विजेत्या संशोधकाला देण्यात येते.

### युवा वैज्ञानिक पुरस्कार

भारतीय विज्ञान कॉन्ग्रेस संस्थेद्वारा १९७४ पासून हा पुरस्कार देण्यास सुरुवात झाली. विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय तथा विलक्षण योगदान देणाऱ्या युवा संशोधकांची ओळख व्हावी तथा त्यांना प्रेरणा मिळावी हाच या पुरस्काराचा उद्देश होय.

या पुरस्काराच्या माध्यमातून २०२० पर्यंत ८८९ युवा संशोधकांना सन्मानित करण्यात आले. त्यातील बहुतांश वैज्ञानिकांनी आपल्या पुढील कार्यकाळात देशाकरता आणि विदेशातही आपल्या संशोधनाचा ठसा उमटविला आहे.

वर्षभरात जास्तीत जास्त ४० युवा संशोधकांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यात कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे असून भारतभरात विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात भरीव संशोधन करणाऱ्या युवासंशोधकांचे नामांकन विद्यापीठ संशोधन संस्था इ. करत असतात.

सन्मानित युवा संशोधकास १ लाख रुपये, पदक आणि प्रमाणपत्र देण्यात येते. ❖

- संकलन - निलेश माने (अंबरनाथ)

# चला संकल्प करु या, सकाळी लवकर उठू या



☞ सकाळचे वातावरण फारच उत्साहपूर्ण आणि आनंददायक असते. या वेळी व्यायाम करणे, ध्यान-धारणा करणे, प्राणायाम करणे, सूर्यनमस्कार घालणे फायदेशीर असते. त्यामुळे आपल्यात आत्मविश्वासात नक्कीच वाढ होते. आपली विचारसरणी सकारात्मक बनते.

☞ आपण दुसऱ्यासाठी भरपूर वेळ देत असतो; पण स्वत:साठी मात्र वेळ काढणे अतिशय कठीण झाले आहे. त्यामुळे पहाटे लवकर उठलो तर आपण स्वत:ला वेळ देऊ शकतो.

☞ सकाळी लवकर उठल्यामुळे आपले मन अतिशय प्रसन्न आणि प्रफुल्लीत राहते. त्यामुळे हाती घेतलेल्या कामात गोडी वाढते. त्या कामात आपले मन लागते.

☞ सकाळच्या शांत आणि निवांत वेळी आपण वाचन केले तर ते लक्षात राहते. वातावरण शांत असल्याने वाचनात अडथळे येत नाहीत.

☞ सकाळी मेंदू अतिशय कार्यक्षम असतो, त्यामुळे काम करताना थकवा जाणवत नाही. कार्यक्षमतेत वाढ होते. दैनंदिन कामे वेळेवर पूर्ण होत असल्याने कुठलाही ताणतणाव येत नाही.

## सकाळी उशिरा उठण्याचे तोटे :-

☞ रात्री जागरण केल्यामुळे झोप पूर्ण होत नाही. परिणामी चिडचिडेपणा येतो. मनात नैराश्य येते. कामाचा ताण वाढतो.

☞ उशिरापर्यंत झोपून राहिल्यामुळे व्यायाम, प्राणायाम, सूर्यनमस्कार यासाठी वेळ मिळत नसल्याने प्रकृतीकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे शरीरावर वाईट परिणाम होतात. थकवा जाणवतो, आरोग्यही बिघडते.

सकाळी लवकर उठण्यासाठी काही टिप्स

☞ रात्री झोपताना असा दृढनिश्चय करायचा, की आपल्याला सकाळी लवकर उठायचंच आहे.

☞ हळूहळू सुरुवात करावी. जर आपल्याला पहाटे पाच वाजता उठायचे असेल तर एकदम पाच वाजता उठू नये. त्याऐवजी अर्ध्या अर्ध्या तासाचे टप्पे बनवावे. म्हणजेच आपण जर सकाळी सात वाजता उठत असू तर पहिल्या दिवशी साडेसहा वाजता उठावे. दुसऱ्या दिवशी सहा वाजता उठावे; असे करत करत पाच वाजता उठावे.

☞ रात्री लवकर झोपायची सवय लावावी.

☞ रात्री शक्यतो हलका आहार घ्यावा.

☞ झोपण्याआधी चहा, कॉफी यासारखी उत्तेजक पेये सेवन करु नये. ❖





कथा

# महात्मा बुध्दांचा बोध

एका गावात नदीच्या किनारी काही लहान मुले खेळत होती. ती मुलं वाळूत आपली घरे बनवत होती. एका मुलाचा पाय दुसऱ्या मुलाच्या घराला लागायचा आणि त्याचे वाळूचे घर तुटून जायचे. त्याच्यावरुन त्यांच्यात भांडणे सुध्दा व्हायची. मग तो मुलगा मनात सुडाची भावना ठेवून त्या दुसऱ्या मुलाने बनवलेल्या वाळूच्या घरावर जाऊन बसायचा व ते नष्ट करायचा आणि पुन्हा आपले घर बनवण्यात मग्न होऊन जायचा. असा मुलांचा खेळ सुरु होता.

हा सर्व खेळ महात्मा बुध्द शांतपणे आपल्या शिष्यांसोबत एका बाजूला उभे राहून पाहत होते. मुले तर आपल्या खेळात रंगून गेली होती. त्यामुळे कोणाचेही लक्ष त्यांच्याकडे गेले नाही. बराच वेळ हा खेळ सुरु होता. थोड्याच वेळात गावातील एक वृध्द स्त्री तेथे आली आणि मुलांना दटावत म्हणाली, "अरे संध्याकाळ झाली, सूर्य मावळलाय. चला, पळा घरी. तुम्हा सर्वांच्या आया तुमची वाट पाहत असतील." मुलांनी आश्चर्याने वर पाहिले. खरोखरच संध्याकाळ झाली होती आणि अंधारही पडू लागला होता. त्यानंतर सर्व मुलांनी आपणच बनवलेल्या वाळूंच्या घरांवर उड्या मारुन मारुन सगळी घरे नष्ट केली. कोण कोणाचे घर तोडतोय हे देखील त्यांनी पाहिले नाही आणि सगळे त्याच आनंदात मस्ती करत आपापल्या घराकडे निघून गेले.

हे दृश्य पाहून महात्मा बुध्द आपल्या शिष्यांना म्हणाले, "जीवन म्हणजे काय असतं याची कल्पना तुम्हाला या मुलांच्या खेळावरुन आली असेल. कारण माणसानं बनवलेली घरं, महाल-माड्या सारं काही इथंच राहून जातं. आपण उगाच एक एक इंच जागेसाठी भांडत बसतो. एकमेकांचं नुकसान करतो; परंतु एक दिवस आपल्याला हे सगळं सोडून जावं लागणार हे मात्र आयुष्याच्या धावपळीत विसरुन जातो. आपण कोण आहोत? कशासाठी आलो आहोत? आपल्याला काय साध्य करायचं आहे? हे विसरुनच जातो. एक ना एक दिवस सर्वांनाच जायचंय आहे. त्यामुळे खूप दूरचा विचार करत आयुष्य चिंतेत न घालवता वर्तमानात जगता आलं पाहिजे."

संत महापुरुषही म्हणतात, की भूतकाळात रमणे आणि भविष्याची चिंता करणे ही माया आहे. वर्तमानात जगणे हेच खरं जीवन आहे. ❖

- संकलन - हसती दुनिया टीम

# बालपण आलं परतून

वय वाढलं तरीही मन लहानच असतं
बालपण कधी सरलं ते कळतही नसतं

टेन्शन नसतं काही अन जबाबदारी नाही
असतात सदा मोकळ्या सर्व दिशा दाही

जे जे हवं ते ते खायचं होत नव्हते विकार
मौज मस्ती करायला कधी नव्हता नकार

मोकळं असतं आभाळ अन् मोकळं असतं रान
गुणगुणतात ओठ सदा स्वातंत्र्याचं गान

मुलं मोठी झाली आणि जिकडे तिकडे गेली
नातवंडांशी माझी मात्र गट्टी छान जमली

बाळ गोपाळात रमण्याची हौस होती भारी
निर्मळ मनाचा अनुभव घेण्याची गम्मतच न्यारी

लुटूपुटूचे खेळताना खेळ वय गेलो विसरुन
धमालमस्ती करताना बालपण आलं परतून

– राज भिंगारे



# इस्रोचे अतुलनीय यश - चांद्रयान -३ मोहिम




भारताने २३ ऑगस्ट २०२३ रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर चांद्रयान -३ मोहीमेअंतर्गत आपले यान यशस्वीरित्या उतरवले आणि अमेरिका, रशिया आणि चीननंतर असे करणारा चौथा देश बनला. लँडर विक्रमने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाला स्पर्श केला आणि प्रज्ञान रोव्हर लँडरमधून बाहेर आले. त्याने अनेक प्रकारची माहिती पृथ्वीवर पाठवली आहे. चांद्रयांन-३ चे यशस्वी लँडिंग हे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाचे मोठे यश आहे. चांद्रयान-२ मोहिमेत अंतिम टप्प्यात आलेलं अपयश चांद्रयान-३ च्या माध्यमातून पुसून काढण्यात आलं आहे.

इस्त्रोने श्रीहरीकोटा येथील सतीश धवन प्रक्षेपण केंद्रामधून १४ जुलै रोजी चांद्रयान-३ चे प्रक्षेपण केले होते. ४१ दिवसाच्या प्रवासानंतर चांद्रयान-३ चंद्राच्या पृष्ठभागावर उतरले. यावेळी भारतानं ऑर्बिटर न पाठवता प्रॉपल्शन मॉड्यूल पाठवले होते. ते चंद्राभोवती पुढील किमान सहा महिने फिरत राहून पृथ्वीचा अभ्यास करेल. चांद्रयान-३ मोहीम भारताच्या चंद्रसंशोधन कार्यक्रमातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. चंद्रावरील संभाव्य संसाधनांबद्दलची तसेच त्यावर आढळणाऱ्या खनिजांची माहिती मिळवणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवले गेले. हा प्रदेश पाण्याच्या बर्फाने समृध्द असल्याचे मानले जाते. आपल्या चंद्रावरील भ्रमंती दरम्यान लँडर सोबत चार उपकरणे होती. त्यातील चास्ते या उपकरणामध्ये एका सेन्सर आणि हिटरचा समावेश आहे. हे उपकरण चंद्रावरील जमिनीत १० सेंटीमीटर खोलीपर्यंत रोवण्यात आले. चंद्राच्या मातीमध्ये उष्णतेचे वहन कसे होते, पृष्ठभागापासून आत तापमान कसे बदलत जाते, ते या उपकरणामुळे समजले. चंद्राच्या पृष्ठभागावरील तापमानाच्या अनपेक्षित अशा नोंदी या उपकरणाने नोंदवल्या आहेत.

अशाच एका उपकरणाने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर गंधक असल्याचा पुरावा पाठवला आहे. याची माहिती इस्त्रोने आपल्या पत्रकात दिली आहे. त्याचबरोबर चंद्राच्या पृष्ठभागावर ॲल्युमिनिम, कॅल्शिअम, लोह, क्रोमीयम, टायटानीयम, मॅगनिझ, सिलिकॉन, ऑक्सिजनचे अंश सापडले आहेत.

चंद्राचे आयनोस्फिअर हे सतत बदलणाऱ्या प्लाझ्मापासून बनलेले आहे. रंभा या उपकरणाद्वारे चंद्राच्या जमिनीपासून बदलत जाणारी इलेक्ट्रॉनची घनता आणि बदलत्या तापमानाची नोंद घेण्यात आली. बदलत्या सौरवादळांच्या बदलत्या प्रमाणानुसार चंद्राच्या जमिनीजवळच्या भागात प्लाझ्माचे प्रमाण कमी जास्त आढळले.

इल्सा हे उपकरण चंद्राच्या जमिनीवर बसणाऱ्या अतिसूक्ष्म हादऱ्यांचीही नोंद घेऊ शकते. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाच्या भूहालचालींचा अभ्यास या उपकरणाद्वारे करण्यात आला. त्याची माहिती इस्त्रोने आपल्या २६ ऑगस्ट च्या पत्रकात दिली आहे. ❖

# योग्य पर्याय निवडा

१) भाऊबीज या सणाला असेही म्हटले जाते ..... यमद्वितीया / वसुबारस

२) जगात सर्वात जास्त देश असलेला खंड ...... आफ्रिका / आशिया

३) सर्वात वेगवान ग्रह ...... बुध / शुक्र

४) सर्वाधिक विटामिन सी असलेले फळ ..... आंबा / आवळा

५) मुघल सत्तेचा शेवटचा सम्राट ..... औरंगजेब / बहादूर शाह जफर

६) बर्फाची भूमी ...... कॅनडा / स्वित्झर्लंड

७) इकडे आड तिकडे विहीर..... या वाक्प्रचाराचा अर्थ.... दोन्हीकडे संकट / दोन्हीकडे पाणी

८) दोन नोबेल पुरस्कार मिळवणारी महिला शास्त्रज्ञ ...... मेरी क्युरी / इरेन क्युरी

९) मिशन चांद्रयान - ३ चे चंद्रावर उतरलेले रोव्हर ...... विक्रम / प्रज्ञान

१०) दादासाहेब फाळके पुरस्कार या क्षेत्रासाठी दिला जातो ...... चित्रपट / नृत्य

११) आंबोली हे थंड हवेचे ठिकाण या जिल्ह्यात आहे ...... सिंधुदुर्ग / सातारा

१२) चंद्रभूमीवर जाऊन आलेले एकूण अंतराळवीर ...... १२ / १४

१३) शीख सेना या नावाने ओळखली जाते ...... अकाली / खालसा

१४) पंडित नेहरुंनी लिहिलेला ग्रंथ ...... डिस्कवरी ऑफ इंडिया / सत्याचे प्रयोग

१५) नरकासुराचा वध करण्यात श्रीकृष्णांना सहाय्य केले ...... रुक्मिणी / सत्यभामा

उत्तरे इतरत्र

संतकथा

# श्रीखंड्याचा वियोग



पैठणला नाथांच्या सेवेसाठी आलेला दहा-बारा वर्षांचा श्रीखंड्या चांगलाच एकरुप झाला होता. आपल्या अथक सेवेनं त्याने सर्वांचं मन इतकं मोहून टाकलं होतं, की श्रीखंड्याशिवाय पानही हालत नसे. नाथांच्या वाड्यातील रांजण नदीवरुन कावडीने पाणी आणून भरणे, पूजेची तयारी करणे, गिरिजाबाईंना घरकामात मदत करणे इ. सारी कामं तो आवडीने करी.

एके दिवशी मदन नावाचा एक गृहस्थ द्वारकेहून आला. नाथ पूजा आटोपून बाहेर आले. त्यांना पाहून नाथमहाराज म्हणाले, "या, फार लांबून आलेले दिसाताहात."

"हो हो, मी द्वारकेहून आलोय. आपणच नाथमहाराज आहात का? अहो, मला माझ्या सख्याला लवकर भेटवा हो. कुठाय तो?" असं म्हणून मदन नाथांच्या चरणी लोटांगण घालत घळाघळा अश्रू ढाळू लागला.

नाथमहाराज आश्चर्य व्यक्त करीत म्हणाले, "कोण सखा? कुणाबद्दल बोलताय आपण?" मदन म्हणाला, "मी कृष्णाबद्दल बोलतोय. तो तुमच्याकडे आलाय, कुठाय माझा श्रीहरी?"

नाथ म्हणाले, "अहो, श्रीहरी तर साऱ्या विश्वात भरलाय. चरा-चरात नटलेला आहे. आपल्या हात बाहेर त्याचीच तर सत्ता आहे."

नाथांच्या बोलण्याने किंचितशा रागानेच मदन म्हणाला, "हे बघा नाथबाबा, आता मला तुमचं कोरडं ब्रह्मज्ञान नकोय. माझा जास्त अंत पाहू नका. माझा मुरलीधर कान्हा इथे तुमच्याकडेच आलाय. बोलवा त्याला लवकर." एवढ्यात पाण्याने भरलेल्या रांजणाकडे त्याचे लक्ष गेले. त्याबरोबर भावनावश होत त्या रांजणाला नमस्कार करत तो म्हणाला, "माझ्या श्रीहरीनेच हे रांजण पाण्याने भरलेलं दिसतंय." नाथ म्हणाले, "अहो, तो रांजण तर आमच्या श्रीखंड्याने भरलाय." तेवढ्यात आनंदाने टाळी वाजवत मदन म्हणाला, "हो हो, तो श्रीखंड्या नाही. माझा मुरली मनोहर आहे तो! बोलवा त्याला."

श्रीखंड्या कावड घेऊन नदीवर गेला होता. नाथ म्हणाले, "श्रीखंड्या नदीवर गेलाय, येईलच

इतक्यात!" बराच वेळ झाला तरी श्रीखंड्या आला नाही. उध्दवने त्याचा सगळीकडे शोध घेतला. नदीकाठी कावड ठेवून श्रीखंड्या निघून गेला होता. कुठे गेला कुणालाच सांगता येईना. मदनची अवस्था तर पाण्यावाचून तडफडणाऱ्या माशासारखी झाली होती. नाथांनी त्याला धीर देत सारी हकीकत जाणून घेतली. मदन म्हणाला, "मी अनुष्ठानाला बसलो असताना मला स्वप्नात दृष्टांत झाला. भगवान श्रीकृष्ण म्हणाले, पैठणला नाथवाड्यात श्रीखंड्या या नावाने मी नाथांची आवडीने सेवा करत आहे. साक्षात श्रीकृष्णाने दिलेल्या या दृष्टांताप्रमाणे मी पैठणला येण्याचा निश्चय केला आणि विचारत विचारत इथपर्यंत आलो. पण ....." असे म्हणून तो रडू लागला. नाथांच्या डोळ्यांतूनही घळाघळा अश्रू ओघळू लागले. व्याकूळ होत त्यांनी हाक मारली. "श्रीखंड्या! देवा कसं रे ओळखलं नाही मी तुला? का ठकवलंस मला? असा कोणता अपराध घडला माझ्या हातून?"

श्रीखंड्याचं अवचित येणं जितकं सुखदायी ठरलं त्याहून अधिक त्याच्या आकस्मात जाण्याचं सर्वांना दु:ख झालं. श्रीखंड्याच्या आठवणीने गिरिजाबाईंचं अंत:करण तीळ-तीळ तुटत होतं.

"देवा! किती रे शिणवलं मी! केरकचरा काढून घेण्याची हलकी कामंही तुझ्याकडून करुन घेतली. किती राबराब राबलास रे! तुला असं जायचंच होतं निघून तर मग आई, आई म्हणत का लळा लावला? अरे, तुझं लग्न थाटात लावून द्यायचं होतं मला! श्रीखंड्या म्हणून हाक मारताच धावून येणारा, माझ्या हातचं अन्न आवडीने खाणारा माझा श्रीखंड्या आता तू मला केव्हा भेटणार?"

गिरिजाबाई आर्तपणे कितीतरी वेळ स्वत:शीच बोलत होत्या.


- क्रमश:

**विशेष**

# भारतातील प्रमुख पर्यटन स्थळं

| | | |
|---|---|---|
| १) राष्ट्रपती भवन | - | दिल्ली |
| २) ताज महल | - | आग्रा |
| ३) एलोरा गुफा | - | महाराष्ट्र |
| ४) मेनाचे टॉवर | - | महाराष्ट्र |
| ५) अमरनाथ गुफा | - | काश्मिर |
| ६) वैष्णोदेवी मंदिर | - | काश्मिर |
| ७) फोर्ट विलियम | - | कोलकाता |
| ८) जंतर मंतर | - | दिल्ली |
| ९) इंडिया गेट | - | दिल्ली |
| १०) अजंटा गुफा | - | महाराष्ट्र |
| ११) गेटवे ऑफ इंडिया | - | मुंबई |
| १२) जल महाल | - | जयपूर |
| १३) सुवर्ण मंदिर | - | अमृतसर |
| १४) बुलंद दरवाजा | - | उत्तर प्रदेश |
| १५) पंचमहाल | - | उत्तर प्रदेश |
| १६) गोल घुमट | - | कर्नाटक |
| १७) मिनाक्षी मंदिर | - | तामिळनाडू |
| १८) चारमिनार | - | हैद्राबाद |
| १९) बिर्ला मंदिर | - | हैद्राबाद |
| २०) वेंकटेश्वर मंदिर | - | आंध्रप्रदेश |
| २१) गोलकंदा | - | हैद्राबाद |
| २२) मरीना बीच | - | तामिळनाडू |
| २३) लाल बाग गार्डन | - | कर्नाटक |

# रंग भरा





## सामान्यज्ञान उत्तरे

१) यमद्वितीया
२) आशिया
३) बुध
४) आवळा
५) बहादूर शाह जफर
६) कॅनडा
७) दोन्हीकडे संकट
८) मेरी क्युरी
९) प्रज्ञान
१०) चित्रपट
११) सिंधुदुर्ग
१२) १२
१३) खालसा
१४) डिस्कवरी ऑफ इंडिया
१५) सत्यभामा

## शब्दकोडे

### २२४ चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ को | २ हि | ३ मा | | ४ ने | ५ पा | ळी |
| | ६ मा | ऊ | ७ स | | र्व | |
| | ल | | ई | | ८ ती | ९ स |
| १० सो | य | ११ रा | बा | ई | | दा |
| या | | १२ खा | ई | | | शि |
| बी | | डी | | १३ सु | ग्री | व |
| १४ न | १५ ऊ | | १६ चौ | दा | | रा |
| | १७ स | सा | | १८ मा | न | व |

!! तू ही निरंकार !!

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी । पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी । पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी । पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। गुरू की जै जै जो करता है उसकी होती जै जै कार।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

